# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

Year: 21 **1st February 1996** No. 2


# A G E N D A

**of the General Body Meeting of**
**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
**to be held at 12.00 noon on**
***SUNDAY, the* 10th March 1996**
**Bharatiya Mahavidyalaya, Amravati.**

### *ITEM NO. 195 :*
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**TO CONFIRM** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 15th October 1995 at **Karmavir Mahavidyalaya Mul.** *(copy of the minutes is circulated on page no.01 of 1996 NUTA Bulletin).*

**विषय क्रमांक १९५ (अ)**

**प्रा. डॉ. उध्दव चोरे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव :**

**प्रा.डॉ. एस.व्ही. भुयार हे पुढील प्रस्ताव मांडतील** :- विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय अमरावती येथील रोगनिदान ह्या विषयाचे प्राध्यापक डॉ. उध्दव वासुदेवराव चोरे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११.११.९५ ला शासकिय वैद्यकिय रूग्णालय नागपूर येथे आकस्मिक निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ४३ वर्षाचे होते. डॉ.चोरे हे नुटाचे आजीव सभासद होते व स्थानिक शाखेचे अध्यक्ष होते. या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटूंबीयावर दुःखद प्रसंग आला आहे. त्यांच्या दुःखात नुटाची ही आमसभा सहभागी आहे. त्यांच्या कुटूंबीयांना दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर प्रदान करो अशी प्रार्थना ही सभा करीत आहे.

**विषय क्रमांक १९५ (ब)**

**प्रा. के. भास्कर यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव :**

**Prof. R.Chittaranjan will move the following resolution :-** Prof. K. Bhaskar was lecturer in English,in Dr. Ambedkar Mahavidyalaya Amravati. He was a gentle and sober man with genial nature. Studious and sincere, Mr. Bhaskar was a devoted teacher and a life member of NUTA (L.M.No. 227). In his sad demise the teaching community lost an affectionate colleague. This House condoles the death of Prof. K.Bhaskar, and prays to the Almighty to rest the departed soul in the divine Abode, and also prays to God to provide the members of the bereaved family with the necessary strength to bear this loss.

**विषय क्रमांक १९५ (क)**

**डॉ. श्रीमाळी यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव :**

**Prof. S.B.Chinchamalatpure will move the following resolution :-** The sudden tragic death of Dr. Shrimali shocked the academic world of Vidarbha. Dr. Shrimali was a teacher and then the Principal of Brijlal Biyani Science College Amravati. He was a goodman, a highly studied scholar in his subject and an efficient and successful administrator. He was always active in the participation of the social and academic bodies outside and inside the university. His sudden death created a vacuum which can not be described. This house condoles the sad demise of Dr. Shrimali, and prays to god to lay the departed soul to eternal rest.

### ITEM NO. 196 :
### *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

**TO CONSIDER AND TO APPROVE** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 1995.

***Notes** : (i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No. 2 of 1995) and is to be placed for the approval of the General Body. (ii) The Copy of the Annual Report is circulated in this NUTA Bulletin. (iii) Prof. E.H.Kathale, Secre*

***Agenda continued on page 28***

---

**महाराष्ट्र शासन**

*क्रमांक युएसजी-१५९५/(१३९/९५)-विशि-३*

**उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग**

*मंत्रालय विस्तार भवन, मुंबई४०० ०३२*

**दिनांक २२ जानेवारी १९९६**

प्रति,
कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**विषय** :- *अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी "नुटाला" हस्तांतरित केलेल्या शिक्षक भवनाचा ठराव रद्द करणेबाबत.*

महोदय,

उपरोक्त विषयावरील समक्रमांकित दिनांक ३०.९.९५ चे अर्ध शासकीय पत्र कृपया पहावे.

सदर पत्राच्या संदर्भात आपण पत्र क्र. अवि/१/१२३/ए-२४०५/९५, दिनांक २०.११.९५ अन्वये सादर केलेले स्पष्टीकरण लक्षात घेवून शासनाचे उपरोल्लेखित अशासकीय पत्र मागे घेण्यात येत आहे.

**(त्रि.ब.सेन)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

---

**विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा २८ जानेवारीचा राज्यव्यापी मेळावा रद्द**

***नुटाचे सचिव प्रा.एकनाथ कठाळे यांचे वृत्तपत्रीय निवेदन.***

**दिनांक २४ जानेवारी १९९६**

अमरावती विद्यापीठ शिक्षक भवनाबाबत शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढलेल्या ३० सप्टेंबर १९९५ च्या आदेशाच्या निषेधार्थ अमरावती येथे रविवार दिनांक २८ जानेवारी १९९६ रोजी नुटा व महाराष्ट्र प्राध्यापक संघाने आयोजित केलेला विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा राज्यव्यापी मेळावा, शासनाने हा आदेश मागे घेतल्याने रद्द करण्यात आला आहे.

अमरावती विद्यापीठाने शिक्षक भवनाबाबत घेतलेला निर्णय विद्यापीठ कायद्याच्या कलम ८ (१) (ई) चा भंग करणारा असल्यामुळे तो रद्द करावा असे ३० सप्टेंबर १९९५ च्या आदेशाने शासनाने विद्यापीठाला कळवले होते.

याबाबत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नागपूर अधिवेशनामध्ये १४ डिसेंबर १९९५ रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी "ही कायदेशीर बाब आहे, विधी व न्याय विभागाला दाखवून २२ डिसेंबर तारखेनंतर १५ दिवसाच्या आत कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेण्यात येईल" असे मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले होते.

या बाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला उच्च शिक्षण विभागाने घेतला असून त्यानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आपला ३० सप्टेंबर १९९५ चा आदेश मागे घेणारा फेरआदेश २२ जानेवारी १९९६ ला काढला असून कालच विद्यापीठाला त्याची प्रत फॅक्सवरून पाठवण्यात आली आहे. मुंबई येथे महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या सचिवांना सुद्धा ही प्रत देण्यात आल्याचे त्यांनी मला कळवले आहे.

**एकनाथ कठाळे**
सचिव "नुटा"

# नेटसेट संबधीच्या २२ डिसेंबर १९९५ च्या शासननिर्णयाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ जानेवारी १९९६ च्या बैठकीत मंजूर केलेला ठराव

"जोपर्यंत आपली पर्यायी व्यवस्था होत नाही, तोपर्यंत सिलेक्शन कमिट्यांची निवड प्रक्रिया फायनल राहील. इतकेच नव्हे तर "**२ वर्षानंतर त्यांना कन्फर्म करा**" असे चान्सलर महोदयांच्या मान्यतेचे स्टॅट्यूट आहेत ... माझे म्हणणे असे आहे की, जी टेस्ट आहे, ती रिक्रुटमेंटची एक वेगळी पद्धत आहे. ती पद्धत जोपर्यंत अंमलात येत नाही तोपर्यंत परिनियमानुसार झालेली रिक्रुटमेंट १०० टक्के लॉफूल आहे. माननीय चान्सलर यांच्या सहीने आपण ते ठरविले आहे, जो २७.२.८९ चा जी.आर काढला त्याप्रमाणे स्टॅट्यूट झालेले आहे. या सर्व ॲडर्व्हटाइजमेंट ॲग्रुव्ह झालेल्या आहेत. नियमाप्रमाणे त्या सर्व रिक्रुटमेंट परफेक्टली लॉफूल अशा झालेल्या आहेत. ज्या दिवशी आपण नवीन व्यवस्था, **नवीन अल्टरनेट अरेंजमेंट कराल त्या दिवसापासून ते लागू होईल. सुटेबली रिप्लेसड होईल,** अशी खरी गोष्ट आहे. यामध्ये आज सेवेत असलेले जे शिक्षक आहेत त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. त्यांच्या नेमणूकपत्रामध्ये तसे नाही, त्यांना कधी तसे सांगितले नाही, जाहिरातीमध्ये तसे जाहीर केले नाही.... आज सेवेत असलेल्या लोकांना लागू होत नाही. कारण त्यांचे सिलेक्शन लॉफूल आहे, ते कंडीशनल नाही. लॉ-फुली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीच्यामार्फत चान्सलरांच्या स्टॅट्यूटप्रमाणे ते रिक्रुट झालेले आहेत. त्यांना कॉम्पीटन्ट ॲथारिटीची मान्यता आहे. त्यांना ते लागू होत नाही. **सेवेत असलेल्या लोकांना ते लागू करण्याचे आपण या २-४ महिन्यात आदेश काढले ते आपण केंव्हा मागे घेणार असा प्रश्न आहे. याचे माननीय मंत्री महोदय उत्तर देतील काय?**" एवढी माहिती विधानपरिषद सभागृहामध्ये ऐकून घेतल्यानंतर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी "**यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. तर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील.**" असे स्पष्ट आश्वासन गुरुवार दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहामध्ये दिल्यानंतर "**नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**" अशी तरतूद असलेला शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला २१ महिन्याचा कालावधी लागावा **ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.**

२. २२ मार्च १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी विधानभवनात या संबंधात बोलाविलेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याबाबतची आपली **भूमिका पुढील शब्दात ठामपणे मांडली होती.** "१९८९ ते १९९४ या काळामध्ये यथोचितरित्या निवड समितीसमोर जाऊन निवड झालेल्या व सेवेमध्ये असलेल्या प्राध्यापकांवर पूर्वलक्षी प्रभावाने राष्ट्रीय पात्रता परीक्षा लादणे, केवळ अन्यायाचेच नसून उघडउघड बेकायदेशीरपणाचे सुद्धा आहे ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक संघाचा महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर, १८ जानेवारी १९८९ रोजी, झालेल्या समझोत्याचा उघडउघड भंग करणारी असून २७.२.८९ चा शासन निर्णय व त्यावर आधारित मा. कुलपतींच्या संमतीने करण्यात आलेले परिनियम यातील तरतुदींचा भंग करणारी आहे. उक्त कालखंडामध्ये नियुक्ती झालेल्या प्राध्यापकांची पदे भरतांना जाहिराती या विद्यापीठांनी मान्य करून दिलेल्या होत्या, निवड समिती कायद्याप्रमाणे रचीत झालेली होती. त्यावर शासनाचे प्रतिनिधी नेमण्यात आलेले होते. या नेमणुकांना विधीवत मान्यतासुद्धा प्राप्त झालेल्या आहेत. अशा रीतीने कायदेशीररित्या झालेल्या या नेमणुकांवर व ते पद धारण करणाऱ्या शिक्षकांवर आता मागाहून "नेट" लादण्याचा प्रयत्न मागे घेण्यात यावा. केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे."

३. २२ मार्च १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेली बैठक सुरू होण्यापूर्वी वरील भूमिका स्पष्ट करणारे ९ मुद्यांचे लेखी टिपण महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी संघटनेच्या वतीने मा. मुख्यमंत्र्यांना सादर केले होते. या टिप्पणीची पोच असलेली प्रत आजही संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध आहे. दिनांक २५ सप्टेंबर १९९५ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मंत्रालयावर आयोजित केलेल्या मोर्चाच्या वेळी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना दिलेल्या निवेदनामध्ये ३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याचे परिपत्रक शासनाने मागे घेतले नाही तर संघटनेला आंदोलनाशिवाय पर्याय रहाणार नाही याची स्पष्ट जाणिव दिली होती. विद्यमान मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. शिक्षण सचिव यांनी ६ नोव्हेंबर १९९५ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी बोलाविलेल्या बैठकीच्यावेळी या सर्व मुद्यांचे पुनःकथन संघटनेच्या वतीने मा. मंत्रिमहोदयांसमोर करण्यात आले. या बैठकीचे जे एकतर्फी कार्यवृत्त मा. सचिवांनी नोंदविले आहे. त्याची प्रत संघटनेकडे पाठविण्यात आली असून या कार्यवृत्तात असे नमूद आहे की "**जे अधिव्याख्याता ३१ मार्च १९९६ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना सेवेतून मुक्त करण्यात यावे. असे शासनाचे सध्याचे आदेश आहेत. तथापि त्यावर पुन्हा शासनाकडून जरूर तो विचार करण्यात येईल.**"

४. शासनाने **जरूर तो विचार** करून आता "नेटसेट बाबतचा २२ डिसेंबर १९९५ चा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयाची काळजीपूर्वक छाननी केल्यास असे दिसून येते की :-

**(अ)** नेटसेट बाबत शासनाची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी व महाराष्ट्र शासनाशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा जो समझोता झाला त्याच्याशी पूर्णपणे विसंगत होती याचा कबुलीजबाबच या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाने दिलेला आहे. "**नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**" हा शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ (अ) मधील उल्लेख म्हणजे एमफक्टोने याबाबत घेतलेली भूमिका किती बिनचूक होती याचा पुरावाच आहे. तथापि **तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देणे, सेवेत असलेल्या अधिव्याख्यात्यांना नेट सेट परिक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे, न झाल्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा जेष्ठता न देणे या शासन निर्णयातील अटी संपूर्णपणे समझोत्याच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनांच्या सुचनांच्या विरुद्ध आहेत.** त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या अशी मागणी ही सभा करीत आहे.

**(ब)** केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे." या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या भूमिकेचा पुनरूच्चार करण्यात येत आहे.

**(क)** "नेट सेट परीक्षा ३१ मार्च १९९४ पर्यंत उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **पहिल्या सोमवारी** काढावयाचा, "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **दुसऱ्या सोमवारी** काढावयाचा व "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **तिसऱ्या सोमवारी** काढावयाचा **या स्वतःवर लादून घेतलेल्या विक्षिप्त प्रकारातून उच्च शिक्षण विभागाची आता मुक्तता झालेली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.**

**(ड)** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या सूचनांच्या आधारावर झालेल्या **समझोत्याचा भंग करणाऱ्या कोणत्याही अटी स्वीकारण्यास हे कार्यकारी मंडळ ठाम नकार देत आहे.**

**(इ)** कोठारी कमिशनचा अहवाल, डॉ. राधाकृष्णन कमिशनचा अहवाल, सेन समितीचा अहवाल, मेहरोत्रा समितीचा अहवाल, यातून राष्ट्रीय पातळीवर स्थिर झालेल्या विचारमंथनाशी या अटी पूर्णपणे विसंगत असून **उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे हे संपूर्णपणे "लोकल प्रॉडक्शन" आहे ही गोष्ट जाहीर पणे नमूद करणे आवश्यक वाटते.** केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना यांच्याशी या अटी पूर्णपणे विसंगत आहेत.

**(फ)** तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देण्याला राजमान्यता प्रदान करून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने इतिहासाचे काटे उलटे फिरविलेले आहेत. **अगोदरच शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या दुकानदारीला व भ्रष्टाचाराला "युरिया, सुफला व सुपर फॉस्पेट" या दर्जाचे "तदर्थ नेमणुकांचे" रासायनिक खत पुरविण्याच्या या निंद्य प्रकाराची जेवढी करावी तेवढी निर्भत्सना थोडीच आहे.**

*****

# नेटसेट बाबतच्या उच्च शिक्षण विभागाच्या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाच्या धोरणाविरुद्ध पत्र आंदोलन

*पत्राचा नमुना*

प्रति,
मा. सचिव
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई३२

प्रेषक प्रा.————————

दिनांक मार्च १९९६

**विषय :-** कायदेशीर रित्या भरती झालेल्या अधिव्याख्यात्यांच्याबाबतीत नेटसेटची अट नियमबाह्य रीतीने सुरू न ठेवण्याबाबत.
**संदर्भ :-** *१. दिनांक १८.१.१९८९ रोजी महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघामध्ये झालेला समझोता. २. महाराष्ट्र शासनाने २७.२.१९८९ रोजी काढलेला शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२८६/१२२४/युएन आय-४ शिक्षण विभाग.३. शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक युएसजी १०९३/(२६४९)/विशि-४ दिनांक २ फेब्रुवारी १९९४. ४. शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक युएसजी १०९३/(२६४९)/विशि-४ दिनांक ७ मार्च १९९४. ५. शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक युएसजी १०९३/(२६४९)/विशि-४ दिनांक २० मार्च १९९४. ६. महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक एनजीसी १७९४/७१४५/विशि-४, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, दिनांक २२ डिसेंबर १९९५.*

मा.महोदय
स.न.वि.वि.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी केंद्र शासनाच्या १७ जून १९८७ व २२ जुलै १९८८ च्या आदेशान्वये देण्यात आलेल्या सुचनांसह महाराष्ट्र शासनाने अंमलात आणावयाची असे क्रमांक १ वर नमूद केलेल्या समझोता पत्रान्वये ठरले होते. त्यानुसार संदर्भ क्रमांक २ वर नमूद केलेला शासन निर्णय प्रसृत करण्यात आला. सदरहू शासन निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये स्पष्ट शब्दात अशी तरतूद आहे की :-

२. ह्या पात्रता परीक्षा विविध माध्यमातून आयोजित करावयाच्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या मुळ निर्णयाच्या (२७.२.८९) परिच्छेद ९ मध्ये अशा स्पष्ट उल्लेख आहे की : "For Purposes of recruitment to the post of Lecturer /Librarian/Director/Instructor of Physical Education in Colleges and Principals of Colleges, the composition of the Selection Committee has already been laid down in Appendix, accompanying Government Resolution, Education and Youth Services Department No. USG 1177/ 129387/XXXII (Cell), dated 25th October, 1977, **The same procedure should continue to be in operation till it is suitably replaced by the comprehensive test to be prescribed by the University Grants Commission."**

३. विद्यापीठ अनुदान आयोगाने माध्यमासह सर्व तपशील ठरविल्यानंतर जी "निवडीची प्रक्रिया पात्रता परीक्षेसह" येईल ती १९७७ च्या शासन निर्णयांनी विहित केलेल्या विद्यमान निवड प्रक्रियेला" "सुटेबली रिप्लेसड" करील असे शासन निर्णयात नमूद आहे. विद्यमान निवड प्रक्रिया सुटेबली रिप्लेसड झाली काय? हा आजचा खरा प्रश्न आहे व त्याचे उत्तर "नाही" हेच आहे. विद्यमान निवडप्रक्रिया ही शासननिर्णयात नमूद आहे त्याप्रमाणे विद्यापीठांनी परिनियम केलेले आहेत, विद्यापीठाच्या या परिनियमांना मा. राज्यपालांनी कुलपती या नात्याने संमती दिलेली आहे.

४. "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असे संदर्भ ३ वर नमुद केलेल्या शासन पत्रान्वये आदेश काढण्यात आले. "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश संदर्भ ४ वर नमुद केलेल्या पत्रान्वये देण्यात आला. व मग त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश संदर्भ ५ वर नमुद केलेल्या शासन पत्रान्वये देण्यात आला. परिनियमांनी केलेली व्यवस्था पत्राने मोडून काढण्याच्या या प्रकाराने आम्हाला गेली दोन वर्षे अत्यंत तणावात काढावी लागली.

५. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या सूचनांच्या आधारावर झालेल्या **समझोत्याचा भंग करणाऱ्या कोणत्याही अटी स्वीकारण्यास ठाम नकार** देण्याच्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयास माझा पाठींबा आहे.

६. केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे." या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या भूमिकेचा मी पुनरूच्चार करीत आहे.

७. संदर्भ सहावर नमुद केलेल्या शासननिर्णयामध्ये समाविष्ट असलेल्या **तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देणे, सेवेत असलेल्या अधिव्याख्यात्यांना नेट सेट परिक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे, न झाल्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा जेष्ठता न देणे या शासन निर्णयातील अटी संपूर्णपणे समझोत्याच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनांच्या सुचनांच्या विरुद्ध आहेत.** त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या अशी मी मागणी करीत आहे.

पूर्ण नाव -
पत्ता
विषय :-
महाविद्यालयाचे नाव -

आपला विश्वासू
सही

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (MFUCTO)**

**नेटसेट बाबतच्या उच्च शिक्षण विभागाच्या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाच्या धोरणाविरुद्ध पत्र आंदोलन**

## सूचना व कार्यक्रम

**नेटसेट बाबतच्या उच्च शिक्षण विभागाच्या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाच्या चुकीच्या धोरणाविरुद्ध पत्र आंदोलनाचा निर्णय महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने घेतला असून त्याबाबतच्या सूचना व कार्यक्रम पुढील प्रमाणे**

१) पत्र संबंधित प्रत्येक शिक्षकाने, सचिव-उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई४०० ०३२. यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावयाचे आहे. पत्राचा नमुना सोबत दिला आहे.

२) विद्यापीठ स्तरावरील सर्व संघटनांनी पत्राचा नमुना व सूचना जानेवारी महिन्यापर्यंत आपल्या स्तरावरून प्रसृत कराव्या. नेटसेटबद्दलच्या २२ डिसेंबरच्या शासन निर्णयाचे पितळ उघडे पाडणारे विद्यापीठ निहाय व जिल्हा निहाय मेळावे फेब्रुवारी महिन्यात आयोजित करावे.

३) सोबत नमुन्याप्रमाणे पुरेशा प्रती प्रत्येक महाविद्यालयाच्या युनिटने मुद्रित किंवा चक्रमुद्रित करून घ्याव्यात.

४) प्रत्येक शिक्षकाचे पत्र तीन प्रतींमध्ये असावे. मूळ प्रत रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्यावर त्याची दुसरी प्रत विद्यापीठीय संघटनेच्या सचिवांकडे पाठवावी. तिसरी प्रत स्थानिक संघटनेच्या दप्तरी ठेवावी.

५) १ मार्च १९९६ ते १५ मार्च १९९६ या कालखंडात हे काम पूर्ण करण्यांत यावे.

## *अकृषि विद्यापीठे/अकृषि विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालये/विधी महाविद्यालये/शिक्षण शास्त्र महाविद्यालये/ विज्ञान/व्यवस्थापन अभ्यासक्रम समाजशास्त्र संस्था इत्यादीमधील शिक्षक.*

## *शिक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणे व उच्च शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना*

**महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक एनजीसी १७९४/७१४५/विशि-४,**

***उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई४०० ०३२***

**दिनांक २२ डिसेंबर १९९५**

***वाचा :*** *(१) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एनजीसी १२८६ /(१२२४)/विशि-४. दिनांक २७.२.१९८९.*

*(२) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एनजीसी १२८९ /(१६०५)/विशि-४. दिनांक १५.१२.१९८९.*

*(३) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक युएसजी १९९० /(१७२७)/विशि-४. दिनांक ८.१.१९९१.*

*(४) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एनजीसी १८९२ /(२२८४)/विशि-४. दिनांक २३.१०.१९९२.*

*(५) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एनजीसी १७९२ /(२२८४)/विशि-४. दिनांक २७.११.१९९२.*

*(६) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक युएसजी १९९४ /(७९४१/२८३३)/विशि-४. दिनांक ८.६.१९९४.*

*(७) शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक युएसजी १०९३/(२६४९)/विशि-४ दिनांक २८.४.१९९४.*

**शासन निर्णय :-** शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी १२८६/(१२२४)/विशि-४ दिनांक २७.२.१९८९ अन्वये अकृषि विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये, शासकीय विज्ञान, व्यवस्थापन अभ्यासक्रम, समाजशास्त्र संस्था, शिक्षण शास्त्र महाविद्यालये व विधी महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणे व शिक्षणाचा दर्जा उंचावणे यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले असून हे आदेश दिनांक १.१.१९८६ पासून शिक्षक ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक/निदेशक या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्नातकोत्तर पदवी परीक्षा ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे व याशिवाय याकरिता असणारी पात्रता परीक्षा पास झालेली असणे ही नियुक्तीच्या वेळी आवश्यक अट असल्याचे आदेश आहेत.

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी १२८९/१६०५/विशि-४ दिनांक १५.१२.१९८९ अन्वये अधिव्याख्याता पदाकरिता असलेली शैक्षणिक अर्हता धारण करणारे ५५ टक्के गुणांसह पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण **जे कर्मचारी अधिव्याख्याता पदावर दिनांक १.१.८६ ते २७.२.८९ या कालावधीत झाले आहेत** व ज्यांनी एम.फील परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही, **त्यांच्या नियुक्त्या नियमित करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.**

३. शासन पत्र क्रमांक युएसजी १०९३/(२६४९)/विशि-४ दिनांक २८.४.१९९४ अन्वये ज्या अधिव्याख्यात्यांच्या **नियुक्त्या दिनांक २७.२.१९८९ ते ३१.३.१९९० या कालावधीत झाल्या आहेत** व ज्यांनी दिनांक २७.२.१९८९ पूर्वी अधिव्याख्याता पदासाठी असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे **त्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून सूट देण्यात आली आहे.**

४. जे अधिव्याख्याता पदव्युत्तर परीक्षेत ५५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत व **ज्यांची नियुक्ती दिनांक १९.९.१९९१ पर्यंत झाली आहे.** परंतु ज्यांनी एम.फील परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही त्यांना एम.फील परीक्षेची अट शिथिल करण्यात आली असून **त्यांच्या नियुक्त्या नियमित करण्यात येत आहेत.**

५. शासन याव्दारे असे आदेश देत आहे की, जे अधिव्याख्याता ५५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत व **३१.१२.९३ पर्यंत** एम.फील परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत व ज्यांनी पीएच.डी. चा प्रबंध सादर केला आहे व ज्यांच्या नियुक्त्या विद्यापीठाच्या सक्षम समितीमार्फत करण्यात आल्या आहेत त्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येत आहे. तसेच जे अधिव्याख्याता ५५ टक्केपेक्षा कमी गुण मिळवून पदव्युत्तर परीक्षा व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत व ज्यांनी ३१.१२.१९९३ पर्यंत एम.फील परीक्षा उत्तीर्ण केली आहे अथवा ज्यांनी ३१.१२.१९९३ पर्यंत पीएच.डी. चा प्रबंध सादर केला आहे **अशा अधिव्याख्यात्यांच्या विद्यापीठ सक्षम निवड समितीमार्फत दिनांक ३१.१२.१९९३ पर्यंत झालेल्या नियुक्त्या या आदेशाव्दारे नियमित करण्यात येत आहेत.**

६. शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक युएसजी- १०९३/(२६४९)/विशि-४ दिनांक २८.४.१९९४ अन्वये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवा जरी ते राष्ट्रीय/राज्य पात्रता (नेट/सेट) उत्तीर्ण नसले तरी ३१.३.१९९६ पर्यंत वाढविण्याचे आदेश देण्यात आले आहेत व दिनांक ३१.३.१९९६ पर्यंत जे अधिव्याख्याता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना सेवेतून कमी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

७. या प्रश्नाचा शासनाने गंभीरपणे विचार केला असून शासन या संदर्भात खालील प्रमाणे आदेश देत आहे. :-

(अ) **नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**

(ब) जे अधिव्याख्याता दिनांक १९.९.१९९१ व त्यानंतर सेवेत आले आहेत परंतु ज्यांनी नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही किंवा एम.फील. परीक्षा दिनांक ३१.१२.१९९३ पर्यंत उत्तीर्ण केलेली नाही किंवा पी.एच.डी. प्रबंध दिनांक ३१.१२.१९९३ पर्यंत सादर केलेले नाहीत **अशा सर्व अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील.**

(क) विहित शैक्षणिक अर्हता धारक उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे वरील अर्हता धारक उमेदवाराची नियुक्ती केलेली असेल अथवा करावी लागणार आहे अशा सर्व नियुक्त्या तदर्थ स्वरूपाच्या समजण्यात याव्यात. अशा नियुक्त्या तदर्थ स्वरूपाच्या असल्या **तरीही त्या नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण नाही या कारणास्तव अशा अधिव्याख्यात्यांना सेवेतून कमी करण्यात येवू नये.** परंतु अशा अधिव्याख्यात्यांना ते नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत यापुढील वार्षिक वेतनवाढ देण्यात येऊ नये. ते ज्यावर्षी नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होतील त्या तारखेपासून त्यांना रोखून ठेवण्यात आलेली वेतनवाढ देण्यात यावी. मात्र यामुळे देय होणारी थकबाकी त्यांना अनुज्ञेय राहणार नाही. तसेच तदर्थ नेमणुकीवर काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांची सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी किंवा निवडश्रेणीसाठी विचारात घेतली जाणार नाही. वरिष्ठ किंवा निवड श्रेणीसाठी त्यांची सेवा ते ज्या तारखेला नेट/सेट परीक्षा पास करतील त्या तारखेपासून गणली जाईल. तसेच जे अधिव्याख्याते नेट/सेट परीक्षा आधी पास करतील ते इतरांपेक्षा ज्येष्ठ मानले जातील.

सर्व अकृषि विद्यापीठांनी वरील आदेश आपल्या क्षेत्रातील महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावेत व त्यांची अंमलबजावणी यथायोग्य होते की नाही याची खबरदारी घ्यावी.

मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागांसाठी त्या संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे बिगर मागासवर्ग उमेदवार नियुक्त केला जातो. अशा नियुक्त्या शासन निर्णय दिनांक १९.१.१९९५ च्या आधीन राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(त्रि.ब.सेन)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

*****

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

# DISTRICT -CONTACT MEETINGS

The Dist-Contact meetings are to be conducted to provide the detailed information about the NET/SET Government Resolution, dated 22nd Dec.95 and the real and actual nature of the issue of Shikshak Bhavan.**The agenda of these meetings shall be as follows :**

a) To project the correct impact of the G.R.(No. NGC-1794/7145/vishi-4) dated 22nd Dec. 96 in respect of NET/SET and to discuss the further course of action;

b) To project the real nature of the Govt. Order dated 30th Sept. 95 from the Secretary Higher and Technical Education regarding the Shikshak Bhavan of Amravati University, and to resolve to participate in the future course of action in raising legal aid fund; and

c) to consider the membership drive of the Association and other organisational matters.

All the teachers are requested to attend these meetings.Details of the Programme of District - Contact Meetings of Teachers are as given in the table mentioned below. As these meetings are like district conventions, the members of the concerned district-Units of NUTA are requested to make necessary arrangements, and also to inform all their colleagues about these meetings.

Sd/- **E.H. Kathale**
Secretary "NUTA"

## TABLE
## Giving Details of the Programme of District - Contact Meetings OF TEACHERS.

| Sr.No.Dist. Unit | Place | Day & Date Time | Meetings will be attended by |
|---|---|---|---|
| 1 2 | 3 | 4 5 | 6 |
| 1. Bhandara | J.M.Patel College Bhandara | Saturday 17th February, 1996 4.00 P.M. | E.H.Kathale, M.N.Rode, A.W.Dhage. |
| 2. Amravati | Bharatiya Mahavidyalaya Amravati | Saturday 17th February, 1996 4.00 P.M. | C.D.Kongare, Dr.S.K.Kalnawat, S.G.Puranik, S.T.Sangale. |
| 3. Wardha | Yashwant Mahavidyalaya, Wardha | Sunday 18th February, 1996 11.00 A.M. | C.D.Kongare, R.Chittaranjan, E.H.Kathale, A.W.Dhage. |
| 4. Yavatmal | L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal | Sunday 18th February, 1996 4.00 P.M. | C.D. Kongare, S.A.Tiwari, D.D.Somani. |
| 5. Nagpur City 6. Nagpur Dist | G.S.College of Commerce& Economics Nagpur | Saturday 24th February, 1996 11.30 P.M. | S.B.Chinchmalatpure V.K.Pande S.K.Kalnawat. |
| 7. Chandrapur | Sardar Patel College Chandrapur | Sunday 25th February, 1996 12.30 Noon | E.H.Kathale, A.W.Dhage Dr. A.S.Satputale, V.K.pande A.G.Somvanshi |
| 8. Akola | R.L.T.College Akola | Sunday 25th February, 1996 9.00 A.M. | R.Chittaranjan, A.S.Satputaley A.B.Gawande, S.A.Tiwari |
| 9. Buldhana | Janata Kala Vanijya Mahavidyalaya Malkapur | Sunday 25th February, 1996 3.30 P.M. | R.Chittaranjan, S.A.Tiwari, Dr. A.S.Satputale, S.T.Sangale, |

Be vigilant : Teachers ! : Be conscious

## Save Shikshak Bhavan

# "NUTA LEGAL AID FUND"

* Whereas the Amravati University was proceeding on correct and legal lines, from the day it accepted the donation to construct a Shikshak Bhavan till the day the same "Shikshak Bhavan" was handed over to the Secretary Nagpur University Teachers' Association ; and

* Whereas the Govt. of Maharashtra through the Secretary, Higher and Technical Education, issued the prejudicial and arbitrary Order on 30th Sept.95, asking the Amravati University to take the "Shikshak Bhavan" back into its possession; and

* Whereas the teachers in Nagpur and Amravati University area are unitedly bent on getting justice even at the highest level and are ready to strengthen the Association in all respects, to face the future struggle appropriately and adequately; and

* **Whereas Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court gave an Order "Notice before admission. returnable early. stay as prayed" and no doubt this decision is a great relief against unjust and arbitrary orders of the state Govt., but we must also realise that Association's financial inability to participate in the litigation should not hamper our progress and should not harm our professional interests;**

Now therefore, on this background, it is felt essential that the required finances for the legal fight of Shikshak Bhavan litigation, should be raised as mentioned below :

1. All teachers are requested to contribute Rs. 200/ each to the Save Shikshak Bhavan : NUTA Legal Aid Fund" generously and speedily,

2. This amount of Rs. 200/- by a crossed cheque/ crossed Demand Draft drawn in favour of **"NUTA Legal Aid Fund"** should be sent to S.A.Tiwari, Treasurer NUTA 42. Shankar Nagar Amravati 444 606.

3. For every contribution a receipt shall be issued.

4. All the names of the donors/contributors shall be published in the NUTA Bulletin.

---

Contribute/ Donate Rs. 200/- Speedily to
"NUTA Legal Aid Fund"

crossed cheque/ crossed Demand Draft be drawn
in favour of **"NUTA Legal Aid Fund"**

be sent to S.A.Tiwari, Treasurer NUTA 42. Shankar Nagar
Amravati 444 606.

# नेट सेट बाबतचा २२ डिसेंबर १९९७ चा शासन निर्णय संपूर्णपणे समझोत्याच्या विरुध्द आहे, बेकायदेशीर आहे, यु.जी.सी.च्या सुचनांचा भंग करणारा, इतिहासाचे काटे उलट फिरविणारा व भ्रष्टाचाराला रान मोकळे करून देणारा आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधान परिषद सदस्य*

१. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करतांना दरवेळी मुळात नसलेल्या आपल्या पदरच्या अटी घुसडणे, आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार न पाडणे, परिणामी सबंध महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये अस्वस्थता निर्माण करणे, ह्या अस्वस्थतेच्या पोटी निर्माण होणाऱ्या तीव्र असंतोषामुळे मग हळूहळू एक एक चुकीची गोष्ट दुरुस्त करणे हा जणू महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण खात्याला लागलेला शापच आहे असे म्हटले तर काहीही वावगे होणार नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने १९७३ पासून लागू केलेली वेतनश्रेणी अमलात आणतांना ज्या चुका मंत्रालयातील जेष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी त्यावेळी केल्या होत्या त्याच चुकांच्या बिनचुक आवृत्त्या पुन्हा १९८६ पासून लागू करण्यात आलेली वेतनश्रेणी अमलात आणतांना किती मोठ्या प्रमाणात व किती बिनधोकपणे काढल्या जात आहेत हे पाहिल्यावर अचंबा वाटल्याशिवाय रहात नाही.

२. भारत सरकारच्या शिक्षणखात्याने दिनांक २ नोव्हेंबर १९७४ रोजी महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण सचिवांना पाठविलेल्या (No. -F-1-40/74 U. Govt. of India Department of Education) पत्रात “The Revision of pay-scales, as suggested and payment of Central assistance will be further subject to the conditions stipulated in appendix IV” असे म्हटले असून त्या सोबत १९ अटींचे “conditions for Introduction of revised pay scales ' ' असा मथळा असलेले चौथे परिशिष्टही जोडलेले होते या परिशिष्टामधील पाचवी अट पुढील प्रमाणे होती. :-

“For **future recruitment** to the posts of lecturer in universities as well as in colleges the minimum qualifications shall be as may be prescribed by the University Grants Commission from time to time.’ ªÉÉxÉÆiÉ®ú |ÉÉ®úiÉ [illegible] 02.1975 [illegible] (F-1-1-75.U) [illegible] {ÉÊ®úSÉäônùÉiÉ “The University Grants Commission has now decided that the following qualifications may be prescribed for recruitment to the post of Lecturers in the faculties of Arts and Social Sciences including Commerce and Sciences in Universities and Colleges” अशी सुरुवात करून पुढे पात्रतेच्या अटी दिलेल्या आहेत त्या काळजीपूर्वक पाहिल्या तर विद्यापीठ अनुदान आयोगाने व भारत सरकारने नवीन वेतन श्रेणी लागू करतांना या अटी नव्याने प्राध्यापक म्हणून भरती होणाऱ्यां करीता ठरवून दिल्या आहेत हे यावरून स्पष्ट दिसून येत होते.

३. खुद्द महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने या बाबत घेतलेल्या निर्णयाची जी घोषणा महाराष्ट्राच्या त्यावेळच्या माननीय शिक्षण मंत्र्यांनी दिनांक ४ एप्रिल १९७५ या दिवशी महाराष्ट्र विधानसभेत केली होती त्यामध्ये सुद्धा “मंत्रिमंडळानेही ही उद्दिष्टे समोर ठेवून पुढील प्रमाणे प्रमुख निर्णय घेतले आहेत” असा स्पष्ट उल्लेख आहे. पात्रतेच्या अटीबाबत “विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी जशाच्या तशा शासनाने स्वीकारल्या आहेत या वेतनश्रेणी विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा विद्यापीठांनी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना देण्यात येतील.” असा माननीय शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनात स्पष्ट उल्लेख होता. नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन माननीय कुलगुरू डॉ. दे.य.गोहोकार यांनी दिनांक ७ एप्रिल १९७५ रोजी रात्रौ ‘नुटाच्या’ कार्यकारी मंडळाच्या सभासदांशी २ तास झालेल्या चर्चेमध्ये ही गोष्ट सांगितली होती. इतकेच नव्हे तर शासनाच्या सूचनेवरून वृत्तपत्रामध्ये, कुलगुरू या नात्याने जाहीरपणे तसा खुलासा सुद्धा केलेला होता. या खुलाशाची प्रत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सुद्धा देण्यात आली होती. मा. कुलगुरुंना पुढे पत्र पाठवून शिक्षण सचिवांनी ही धारणा कायम केली.

४. महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण सचिवांनी नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुंना दिनांक १६ मे १९७५ रोजी पाठविलेल्या पत्रात (No. U.S.G. 1175.U) असा स्पष्ट उल्लेख आहे की :-

"I would like to clarify that according to the Government decision the revised U.G.C. pay scales will be applicable to all the University and College teachers who at present, possess qualifications prescribed by the respective Universities". ÊnùxÉÉÆEòÉ 16 ¨Éä 1975 [illegible] "If even after the scrutiny as above it is found that new recruitment is necessary, then only in such cases, persons satisfying the qualifications prescribed by the University Grants Commission at the **recruitment base** (Appendix D) plus additional qualification by way of experience etc. prescribed by the respective Universities for such grades should be recruited after following the usual recruitment procedure". असेहि स्पष्टपणे म्हटलेले होते.

५. असे असतांना देशामध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली याचा फायदा घेवून शासनाने “राईट अबाऊट टर्न” ची भूमिका घेतली. विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्यासाठीचा शासन निर्णय क्रमांक USG-1174/104287) हा दिनांक ४ आक्टोबर ७५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. **"These qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereafter."** अशा प्रकारची अत्यंत निर्बुद्धपणाची शब्द रचना या शासननिर्णयामध्ये टाकण्यात आली. यामध्ये केवळ निर्बुद्धपणाच नव्हता तर कमालीचा दुष्टपणा व आकस ओतप्रोत भरलेला होता. शब्द फिरविण्याच्या शासनाच्या या भूमिकेमुळे उच्च शिक्षण क्षेत्राला कमालीचा धक्का बसला, कुलगुरू हादरून गेले. महाराष्ट्र प्राध्यापक संघाने याचा धिक्कार केला.धिक्काराच्या एका जाहीर सभेनंतर महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या अध्यक्ष व सरचिटणिसांना १ नोव्हेंबर १९७५ रोजी मिसाखाली अटक करून १५ महिने अटकेत ठेवण्यात आले. महाराष्ट्रातील कोणत्याही प्राध्यापकाने ही नवीन वेतनश्रेणी स्वीकारली नाही.

प्रस्तुत लेखकाने ५ नोव्हेंबर १९७५ रोजी याबाबत प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तिकेमध्ये ज्या अनेक कारणासाठी ही तरतूद दुरुस्त करावी असे प्रतिपादन केले होते त्यातील पहिली चार कारणे पुढील प्रमाणे होती :-

“(१) विद्यापीठ अनुदान आयोगाने या पात्रता भावी भरतीसाठी सांगितल्या असून भारत सरकारने सुद्धा त्या भावी भरतीसाठीच सांगितलेल्या आहेत.

(२) केंद्रीय विद्यापीठांना नवीन वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली असून तिचा प्रत्यक्ष अंमलही सुरू झालेला आहे. पण विद्यमान प्राध्यापकांवर या अटी लादण्यांत आलेल्या नाहीत.

(३) उत्तर प्रदेश, बंगाल, बिहार, पंजाब, राजस्थान, गुजरात .आणि त्रिपुरा या इतरही सात राज्यामध्ये नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली असून पहिल्या दोन राज्यात तिचा प्रत्यक्ष अंमलही सुरू झालेला आहे पण पात्रतेच्या या अटी कोठेही विद्यमान शिक्षकांवर लादण्यात आलेल्या नाहीत.

(४) महाराष्ट्र शासनाच्या वतीने माननीय शिक्षणमंत्र्यांनी विधान सभेत दिलेल्या आश्वासनांच्या विरोधात जाणारी ही तरतूद आहे. ”

६. भारताच्या विद्यमान लोकशाहीव्यवस्थेमध्ये नोकरशाहीने कितीहि “हागोडा” करून ठेवला तर त्याचे परिणाम त्यांना जरासुध्दा भोगावे लागत नाही. त्याच्या बऱ्यावाईट परिणामांना राजकीय नेतृत्वालाच तोंड द्यावे लागते. पुढे आंदोलने झाली, कोर्टकचेऱ्या झाल्या. २३ एप्रिल १९७७ रोजी त्यावेळच्या मा. मुख्यमंत्र्यांशी महाराष्ट्र प्राध्यापक संघाची जी बैठक झाली या बैठकीमध्ये झालेले मतैक्य तत्कालीन शिक्षणसचिव श्री. द.म.सुकथनकर यांच्या

स्वाक्षरीने नोंदविलेले असून त्यात परिच्छेद एकच्या पहिल्या उपपरिच्छेदात महाराष्ट्र प्राध्यापक संघाचे म्हणणे पुढील शब्दात नोंदविले आहे. "As regards educational qualifications the main argument of the Federation was that in the statement made by the Minister for Education on the floor of the Assembly on 4th April, 1975, the Government had categorically given a commitment to the effect that the U.G.C. scales will be implemented as they are, in respect of those already in service who had the qualifications laid down by the respective Universities. The Government should stick to this commitment given on the floor of the House." व त्यावर शासनाने काय कबूल केले ते पुढील शब्दात नमुद आहे :- "The Chief Minister said that he did not see any difficulty in accepting this."

७. विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेल्या वेतनश्रेणीची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि. ४ ऑक्टोबर १९७५ रोजी काढलेल्या शासकीय ठरावातील (No. USG 1174/104287-II dated 4.10.75) काही अटींना महाराष्ट्र प्राध्यापक संघाने मुंबई उच्च न्यायालयामध्ये आव्हानीत केले होते. (Special Civil Application No. 2630 of 1976) ज्या काही मुद्यांच्या बाबतीत हे प्रकरण न्यायालयात नेण्यात आले होते त्यामध्ये पात्रतेच्या अटी हा एक मुद्दा होता. दि. २२.४.७७ पासून तर २२.८.७७ पावेतो महाराष्ट्र शासन व प्राध्यापकांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये वेळोवेळी चर्चा व विचारविनिमय होऊन निरनिराळ्या वादग्रस्त मुद्यांच्या बाबतीत मतैक्य झाले व अशा मतैक्याची तीन प्रपत्रे तयार EÒ®úh ªÉÉiÉ +ÉÉä. (Consensus No.1,2and3) [illegible] "É°ÉÖnùÉ (Terms of Settlement) तयार करून न्यायालयामध्ये दाखल करण्यासाठी उभयपक्षांना न्यायालयाने १३.९.७७ ही तारीख दिली होती. त्याप्रमाणे मा. न्यायमूर्ती श्री. तुळजापूरकर यांच्या चेंबरमध्ये १३ सप्टेंबर १९७७ रोजी दुपारी २.४० वाजता मा. न्यायमूर्ती श्री तुळजापूरकर यांच्यासमोर कामाला सुरुवात झाली. यावेळी शासनातर्फे शासनाचे वकील श्री गुरशाणी, शिक्षण सचिव श्री. डी.एम. सुकथनकर व उपसचिव श्री. टेंबे हे हजर होते. प्राध्यापक संघातर्फे संघाचे कायदेपंडित श्री. मदन फडणीस, महाराष्ट्र प्राध्यापक संघाचे अध्यक्ष श्री. डॉ. केणी, सचिव श्री. ठेकेदत्त, कोषाध्यक्ष श्री. कामत, नुटाचे अध्यक्ष प्रा. बी.टी.देशमुख, उपाध्यक्ष श्री. शरद कळणावत, सचिव श्री. अरविंद बारहाते, प्रा.श्री.डी.एस. जाजुर्ले व श्री. बी.एस. देशमुख हे हजर होते. Terms of Settelment मध्ये ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयातील "The qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereinafter." ही शब्दरचना काढून त्याऐवजी "The qualifications mentioned in (a) / (b) above are applicable to lecturers/ teachers who may be recruited hereafter i.e. on or after the date of this revised Government Resolution." ही शब्दरचना टाकण्याचे शासनाने मान्य केले होते. पुढे २५ ऑक्टोबर १९७७ च्या शासन निर्णयात ती शब्दरचना आली.

८. विद्यापीठ अनुदान आयोगाची व केंद्र शासनाची वेतनश्रेणी अमलात आणत असतांना त्यामुळे येणाऱ्या वाढीव अर्थभाराच्या ८० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून घ्यावयाची, ती घेत असतांना "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सर्व अटींचे आपण पालन करू" असे लेखी हमीपत्र द्यावयाचे, प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना मात्र या अटी तोडून मोडून टाकावयाच्या, जे मुळ योजनेत नाही ते घुसडून द्यायचे, जे मुळ योजनेत आहे ते करावयाचे नाही, चर्चा व वाटाघाटीनंतर एकमताने जे ठरले त्याला अनेक फाटे फोडायचे, हा **१९७३ च्या वेतनश्रेणीच्या वेळी नोकरशाहीने "एम फील" च्या निमित्ताने केलेला हातखंडा प्रयोग आज "नेट सेट" च्या नावाखाली पुन्हा महाराष्ट्रामध्ये १९९६ साल उजाडत असतांना केला जात आहे.**

९. महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक संघाशी ११ जानेवारी ते १८ जानेवारी १९८९ या कालखंडात झालेल्या चर्चेच्या शेवटी जे मतैक्य पत्र नोंदविण्यात आले त्याच्या पहिल्याच परिच्छेदात असे नमूद आहे की :-

## नेटसेटबाबतची महत्वपूर्ण कागदपत्रे

*नेटसेटबाबतची खालील महत्वपूर्ण कागदपत्रे १९९४ च्या नुटा बुलेटीनमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. प्रत्येक कागदपत्राच्या सुरूवातीचा अंक अनुक्रमांक असून शेवटीचा अंक १९९४ चा नुटाबुलेटीनचा पृष्ठ क्रमांक आहे. अनुक्रमांक १३ वरील "मुद्दे" या अंकात पुनर्मुद्रित करण्यात आलेले आहेत - संपादक.*


१. **नॅशनल एलिजिबीलिटी टेस्ट** महाराष्ट्र शासन क्रमांक : युएसजी - १०९३ / (२६४९) /विशी - ४ उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ दिनांक २ फेब्रुवारी. १९९४ ... **१९**

२. **राष्ट्रीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण नसणाऱ्या प्राध्यापकांना सेवामुक्त करणे.** महाराष्ट्र विधानसभा ; बुधवार, दिनांक १६ मार्च १९९४ नियम १०५ अन्वये लक्षवेधी. ... **२०**

३. विषय :- **नॅशनल एलिजिबीलिटी टेस्ट** शिक्षण संचालक (उ.शि.) यांचे क्र. एनजीसी/एनईटी/९अ शिक्षण संचालनालय (उ.शि.) म.रा.पूणे-१ दिनांक ९.२..१९९४. २० (उ.शि.) यांचे. ... **२०**

४. महाराष्ट्र शासन क्रमांक विपस १०९४/५०/(२७६४)/विशि-४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक १८ मार्च १९९४. **राष्ट्रीय पात्रता परीक्षा** या सबंधामध्ये विधान परिषदेत दि. १७.३.९४ रोजी झालेल्या चर्चेच्या संदर्भात बैठक. ... **२१**

५. महाराष्ट्र शासन क्रमांक युएसजी-१०९३/(२६४९)/विशि-४ उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ दिनांक ७ मार्च १९९४ **नॅशनल एलिजिबीलिटी टेस्ट** मुदत ३१ मार्च १९९५ पर्यंत वाढविणे.... **२१**

६ शिक्षकांच्या पात्रतेसंबंधी **यु.जी.सी. चे नोटिफिकेशन** व त्यासोबतचे पत्र. University Grants Commission Bahadur Shah Zafar Marg New Delhi-110 002 Published in the Gazette of India on 5th Oct 1991 Part III, Section 4 No. F1-11/87(C.P.P.) Dated 19th Sept. 1991 Notification. ... **24**

7. **MINIMUM QUALIFICATION** University Grants Commission Bahadur Shah Zafar Marg New Delhi Oct 28, 1991 No. F-1-11/87 (CPP) to The Registar, Shivaji University, Kolhapur- ...**24**

८. यु.जी.सी.नोटिफिकेशननुसार राज्य **शासनाने काढलेला दुसरा दुरुस्त आदेश Government** of Maharashtra Higher & Technical Education & Employment Department, **Resolution** No. NG 1792/(2224) UNI-4, Matralaya Annexe, Bombay-400 032. Dated 27th November, 1992. ... **26**

९. यु.जी.सी. च्या नोटिफिकेशननुसार राज्य **शासनाने काढलेला पहिला आदेश Government** Of Maharashtra Higher & Technical Edn & Employment Dept. **Resolution No.** NGC 1892/(2224) UNI-4 Mantralaya Annexe, Bombay-400 032, Dated the 23rd Oct, 1992. ...**26**

१०. **राष्ट्रीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्याची प्राध्यापकांवर करण्यात आलेली सक्ती.** महाराष्ट्र विधान परीषद : गुरुवार दिनांक १७ मार्च १९९४. लक्षवेधी सुचनेवर चर्चा. ... २७

11. Meeting Notice. NET. ...**27**

12. Meeting of the Lecturers affected or likely to be effected by National Eligibility Test . ... **27**

१३. २२ मार्च १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीच्या वेळी प्रा. बी. टी. देशमुख, वि.प.स. यांनी विचारार्थ ठेवलेले मुद्दे... २८

१४. महाराष्ट्र शासन क्रमांक युजीसी- १०९३/(२६४९) विशि-४ उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई-४०००३२ दि. २८ एप्रिल १९९४ **राष्ट्रीय पात्रता परीक्षा मुदत ३१ मार्च १९९६ पर्यंत वाढविण्यात येत आहे**.... ४३

"The Government of India's suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges dated 17th June, 1987 as amended by subsequent agreement dated 4th and 5th Sept., 1987 and Govt. of India's suggestions dated 22nd July, 1988, would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotion involved therein as a composite scheme w.e.f. 1.1.1986" केंद्र शासनाची व्यवस्था **एक समग्र योजना** म्हणून अमलात आणण्याचे शासनाने एकदा मान्य केल्यानंतर प्रत्यक्ष शासन निर्णय २७ फेब्रुवारी १९८९ ला निर्गमित झाला. हे जाहीरपणे नमूद केले पाहिजे की शासन निर्णय ढोबळमानाने जे ठरले होते त्याप्रमाणे केंद्राच्या, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेप्रमाणे निघाला. लहान मोठे काही दोष त्यामध्ये होते हे खरे असले तरी जे ठरले त्याला फाटे फोडून किंवा नवा काही मालमसाला शासन निर्णय काढतांना घुसडून देण्याचा दुष्ट पणाचा प्रकार २७ फेब्रुवारी १९८९ चा शासन निर्णय निर्गमित होतांना घडला नाही.

**१०.** २७ फेब्रुवारी १९८९ चा शासननिर्णय निघाल्यानंतर मात्र शिक्षकांच्या पदरात काही पडु द्यायचेच नाही या दुष्ट भावनेने एकामागून एक मूळ शासन निर्णयामध्ये नसलेले नवनवे विषारी मसाले या शासन निर्णयामध्ये कालविण्याचा प्रकार एकामागून एक महाराष्ट्रात घडत गेला त्यातील **नेटसेट ही शेवटची विषारी पुडी आहे.** मूळ शासन निर्णयात (२७.२.१९८९ च्या) अजिबात आधार नसतांना "**शासन निर्णयाने जरी तीन वेतनश्रेणी दिलेल्या असल्या तरी तुर्त सर्वांची वेतननिश्चिती कनिष्ठ वेतनश्रेणीतच करावयाची आहे.**" असे परिपत्रक २१ जून १९८९ रोजी काढण्यात आले होते. ८ ऑगस्ट १९८९ रोजी विधानपरिषद सभागृहामध्ये त्यावेळच्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी हे परिपत्रक रद्द करण्यात येत असल्याचे सांगितले. "**निवडश्रेणी देण्यासाठी निवड समित्या मार्फतच निवड होणे आवश्यक आहे.**" असे मुळ शासननिर्णयाशी विसंगत परिपत्रक १६ सप्टेंबर १९८९ रोजी शिक्षण सहसंचालक यांनी प्रसृत केले. २० ऑक्टोबर १९८९ रोजी त्यावेळच्या मा. शिक्षण मंत्र्यांनी हे परिपत्रक समझोत्याशी विसंगत असल्यामुळे रद्द करण्यात येत आहे असे विधानपरिषदेत जाहीर केले.

**११.** रिफ्रेशर कोर्सेसबाबत तर उच्च शिक्षण विभागाने कमालच केल्याचे दिसून येते. २७.२.८९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद १२ व १३ मध्ये सिनिअर स्केल व सिलेक्शन ग्रेड मध्ये स्थान निश्चिती होत असतांना "दोन रिफ्रेशर कोर्सेस त्या शिक्षकाने पूर्ण केले असले पाहिजे" अशी अट आहे. तथापि याच शासन निर्णयाच्या परिच्छेद १८ मध्ये "**कोणत्या विषयामध्ये किती प्रमाणात व किती कालखंडासाठी अशा रिफ्रेशर कोर्सेसची व्यवस्था करण्यात आली होती किंवा नव्हती हे लक्षात घेऊन विशिष्ट कालखंडासाठी "रिलॅक्सेशन" देण्याचा विद्यापीठाना अधिकार असेल**" अशा प्रकारची तरतूद आहे. २७.२.१९८९ चा शासन निर्णय झाल्यानंतर निरनिराळ्या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रामध्ये अशा रिफ्रेशर कोर्सेसचे आयोजन त्यापूर्वी करण्यात आले नव्हते व त्यामुळे त्या त्या विद्यापीठांनी विशिष्ट कालखंडासाठी या अटीपासून रिलॅक्सेशन दिले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेप्रमाणे केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांप्रमाणे, ठरलेल्या समझोतापत्रकाप्रमाणे व २७.२.१९८९ च्या महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे अमुक एका तारखेपर्यंत या अटी स्थाननिश्चिती करतांना शिथिल केल्या आहेत, याचा अर्थ त्या तारखेपर्यंत ज्यांची स्थान निश्चिती होणार आहे/ झाली आहे किंवा होऊ घातलेली आहे त्यांना या अटीपासून मुक्तता देण्यात आली असून त्या तारखेनंतर स्थान निश्चिती होणाऱ्या प्राध्यापकांना शिथीलता लागू होणार नाही असा याचा अर्थ होतो.

**१२.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांविषयी असलेल्या आकसाने त्यावेळच्या शिक्षण सचिवांनी दिनांक १५ डिसेंबर १९८९ रोजी एक शासन निर्णय प्रसृत केला व त्याच्या परिच्छेद १ (२) मध्ये "**४ वर्षाच्या आत असे दोन अभ्यासक्रम पूर्ण करण्यांत यावे नंतर पुढे इन्क्रीमेंट बंद करण्यात येतील**" असा चुकीचा अर्थ लावून, करण्यात आलेली/झालेली स्थान निश्चिती सशर्त आहे असे भासविण्याचा प्रयत्न केला. हा काढलेला अर्थ मूळ शासन निर्णयाच्या संपूर्णपणे विरोधात आहे व त्यामुळे तो तत्परतेने मागे घेणे आवश्यक आहे अशा अर्थाची शेकडो पत्रे प्राध्यापकांनी त्यावेळी मा. सचिव उच्च शिक्षण यांना पाठविलेली होती. रिफ्रेशर कोर्सेसची महाराष्ट्रामध्ये व्यवस्था करावयाची नाही मात्र ते रिफ्रेशर कोर्सेस पूर्ण केले पाहिजे न तर वेतनवाढ रोखू अशा धमक्या देत सुटण्याचा हा प्रकार अत्यंत हास्यास्पद होता. ही हास्यास्पदता लक्षात आणून दिल्यावर २० जुलै १९९३ च्या शासननिर्णयाने ही व्यवस्था यथोचितरित्या दुरुस्त करण्यात आली. २१ जुलै १९९३ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेत मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या निवेदनातील शेवटचा परिच्छेद पुढे जसाच्या तसा उधृत करीत आहे. :-

"अशा अधिव्याख्यात्यांना चार वर्षाच्या आत दोन रिफ्रेशर कोर्सेस पूर्ण करणे शक्य नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले

**Madan G. Phadnis**
Senior Advocate,B.A.LL.B

Tel.Offi : 2046430
Residence : 6211550
Gulshan No. 1, Flat 601, 6th Floor,
Juhu Cross Road, Andheri (West)
Bomabay-400 058
Date 14th Nov. 1994

To.
Prof. Mohile,
General Secretary,
Shivaji University
Teachers' Association,
Kolhapur.

Prof. Sambhajirao Jadhav,
Kolhapur.

Sirs,

The Following cases sent to me by your Association came up for admission to-day the Monday 14th November 1994 before the Division Bench of the Bombay High Court of their Lordship Hon'ble Mr. M.L.Pendse, Acting Chief Justice and Hon'ble Mr. Justice S.H.Kapadia.

1) W.P.No. 4636 of 1994 Prof. R.M.Shinde. Not admitted with Liberty to file a civil Suit Claim being of unpaid salary and nothing else.

2) Writ Petition No. 4637 of 1994 Prof. R.A.Kulkarni. **Petition admitted Recovery of encashment salary stayed** in terms of prayer clause (c).

3) Writ Petition No. 4641 of 1994. Shivaji University Teachers' Association. Petition admitted since no recovery. The question of stay does not arise.

4) Writ Petition No. 4656 of 1994. Prof. S.P.Lad, **Petition admitted stay granted** in term of prayer clause (C).

5) Writ Petition No. 4659 of 1994 Prof. Rajaram Shedge Petition admitted stay in term of prayer clause (C)

6) Writ Petition No. 4658 of 1994 Prof. Uttam Chikurdekar, **Petition admitted stay in** term of prayer clause (C)

**2)** Cases of Librarians are getting ready, which I will send you immediately.

**3)** I am sending through a separate packet a writ petition of another Physical Edn. staff.

**4)** I have seen Chancellor's letter to your letter after High Court Judgement. What you propose to do? If you feel that we should file another writ Petition, please let me know so that I can prepare and send it to you.

Please get in touch with me and/or give me a phone call if possible.

Nothing more to add.

Yours fraternally,
Sd\ **Madan G.Phadnis.**

**सूचना** :- *१) ग्रंथपालांच्या वेतननिश्चितीबाबतची प्रकरणे पुन्हा उकरून काढून त्यांच्या निवड/वरिष्ठ श्रेणीतील स्थान निश्चितीचे शासनाने गैरफायदेशीररित्या पूर्नर्निश्चयन केल्याचे प्रकार महाराष्ट्रात आढळून आले आहेत.*

*२) अशा प्रकरणी वेतनातून कपाती सुरु झाल्याचेहि प्रकार आढळून आले.*

*३) "सुटा" ने अशी प्रकरणे मा. उच्च न्यायालयापुढे नेली असून काही प्रकरणी "स्टे" सुद्धा मिळाल्याचे दिसून येते.*

*४) विदर्भात असे एखादे प्रकरण आढळून आल्यास स्टे प्रकरणाची माहिती असावी या हेतूने उपरोक्त पत्र लक्षात आणून देण्यात येत आहे.*

आहे. तेव्हा चार वर्षात रिफ्रेशर कोर्सेस पूर्ण करण्यासंबंधीच्या आदेशावर फेरविचार करून सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सुधारीत आदेशाप्रमाणे अधिव्याख्यात्यांना जर उजळणी वर्गामध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली व अधिव्याख्यात्यांनी त्यात जाणीवपूर्वक भाग घेतला नाही तर त्या परिस्थितीमध्ये त्यांना वेतनवाढ देण्यात येणार नाही. तसेच पुढच्या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यात येणार नाही."

१३. रिफ्रेशर कोर्सेसची अजिबात व्यवस्था नसलेल्या या राज्यामध्ये पदरचे दोन पैसे खर्च करून शासनाने पुरेशा प्रमाणात असे कोर्सेस आयोजित केले तर त्याला प्राध्यापकांनी संपूर्णपणे साथच दिलेली आहे हे शासनाच्या उशिरा कां होईना लक्षात आले हे चांगलेच झाले आहे. "दोन रिफ्रेशर कोर्सेस न केल्यास वेतनवाढ थांबविल्या जाईल" असा मूळ शासननिर्णयाशी पूर्णपणे विसंगत असा शासन निर्णय १५ डिसेंबर १९८९ रोजी निर्गमित करण्यात आला होता. १५ डिसेंबर १९८९ चा हा शासन निर्णय केंद्र शासनाच्या सूचनांशी व मूळ शासननिर्णयाशी संपूर्णपणे विसंगत आहे असे लक्षात आल्यानंतर मा. उच्च शिक्षण मंत्री व विद्यमान उच्च शिक्षण सचिव यांनी पत्र आंदोलनानंतर व विधानपरिषदेतील प्रश्नोत्तराउपरांत ते आदेश रद्द केले.

१४. **नेट सेटबाबत शासनाने आज घेतलेली भूमिका ही मूळ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेशी व शासन आणि महाराष्ट्र प्राध्यापक संघ यांच्यामध्ये झालेल्या समझोत्याच्या संपूर्णपणे विरोधात आहे** हे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या मूळ परिपत्रका सोबतच्या परिशिष्टाच्या परिच्छेद ११ मध्ये "माध्यमा" चा अतिशय स्पष्ट उल्लेख आहे तो पुढील शब्दात :- "Only those candidates who, besides fulfilling the minimum acadamic qualifications prescribed for the post of lecturer, have qualified in a comprehensive test to be specially conducted for the purpose, will be eligible for appointment as lecturers. The

## २२ मार्च १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीच्या वेळी प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स. यांनी विचारार्थ ठेवलेले मुद्दे.

दिनांक १८ जानेवारी १९८९ रोजी झालेल्या समझोत्याप्रमाणे केंद्र शासनाच्या सूचनांनुसार २७ फेब्रुवारी १९८९ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाच्या विरोधात व त्याच्याशी विसंगत अशी अनेक शासकीय परिपत्रके निघालीत.

**(अ) सभागृहात मागे घेतलेली**

१. "शासननिर्णयाने जरी तीन वेतनश्रेणी दिलेल्या असल्या तरी तूर्त सर्वांची वेतननिश्चिती कनिष्ठ वेतनश्रेणीतच करावयाची आहे" असे परिपत्रक २१ जून १९८९ रोजी काढण्यात आले होते. ८ ऑगस्ट १९८९ रोजी सभागृहामध्ये त्यावेळच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी हे परिपत्रक रद्द करण्यात येत असल्याचे सांगितले.

२. "निवडश्रेणी देण्यासाठी निवड समित्या मार्फत निवड होणे आवश्यक आहे" असे मूळ शासननिर्णयाशी विसंगत परिपत्रक १६ सप्टेंबर ८९ रोजी शिक्षण सहसंचालक यांनी प्रसृत केले. २० ऑक्टोबर १९८९ रोजी त्यावेळच्या मा. शिक्षण मंत्र्यांनी हे परिपत्रक समझोत्याशी विसंगत असल्यामुळे रद्द करण्यात येत आहे असे विधानपरिषदेत जाहीर केले.

**(ब) मा. शिक्षणमंत्री व मा. शिक्षण सचिवांनी दुरुस्त केलेले दोष**

३. "दोन रिफ्रेशर कोर्सेस न केल्यास वेतनवाढ थांबविल्या जाईल" असा मूळ शासननिर्णयाशी पूर्णपणे विसंगत असा शासन निर्णय १५ डिसेंबर १९८९ रोजी निर्गमित करण्यात आला होता. १५ डिसेंबर १९८९ चा हा शासन निर्णय केंद्र शासनाच्या सूचनांशी व मूळ शासननिर्णयाशी संपूर्णपणे विसंगत आहे असे लक्षात आल्यानंतर मा. उच्च शिक्षण मंत्री व विद्यमान उच्च शिक्षण सचिव यांनी चर्चा व विचार विनिमयानंतर ते आदेश रद्द केले.

४. "एकूण सेवा" धरावी असे मूळ शासन निर्णयात व केंद्र शासनाच्या सूचनांमध्ये असतांना "बाहेरच्या राज्यातील सेवा धरायची नाही व खंडित सेवा धरायची नाही" असे परिपत्रक १७ डिसेंबर १९८९ रोजी त्यावेळच्या शिक्षण संचालकांनी काढले. याबाबत आंशिक दुरुस्ती नुकतीच करण्यात आलेली आहे.

**(क) इतर विसंगत मुद्दे या ठिकाणी न ठेवता आज चर्चेसाठी असलेल्या पात्रता परीक्षेविषयीचे मुद्दे पुढील प्रमाणे :-**

१. केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या सूचनांमध्ये मूळ पत्रकाच्या परिच्छेद ३ (५) मध्ये व परिशिष्टाच्या परिच्छेद ११ मध्ये **"माध्यमा"** चा अतिशय स्पष्ट उल्लेख आहे.

२. महाराष्ट्र शासनाच्या मूळ शासन निर्णयाच्या (२७.२.८९) परिच्छेद ९ मध्ये **माध्यमाचा :** लेख अतिशय स्पष्टपणे नमूद आहे.

**३. महाराष्ट्रातील माध्यम लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने एकही पात्रता परीक्षा संचालित केलेली नाही. तोपर्यंत "१९७७ च्या शासन निर्णयाने नमूद केलेली निवड प्रक्रिया सुरू राहील." असे स्पष्टपणे शासन निर्णयात नमूद आहे.**

४) विद्यापीठ अनुदान आयोगाने माध्यमासह सर्व तपशील ठरवल्यानंतर जी "निवड प्रक्रिया पात्रता परीक्षेसह" येईल ती "१९७७ च्या शासन निर्णयांनी विहित केलेल्या विद्यमान निवड प्रक्रियेला 'सुटेबली रिप्लेसड' करील" असे शासन निर्णयात नमूद आहे. **विद्यमान निवड प्रक्रिया सुटेबली रिप्लेसड झाली काय? हा आजचा खरा प्रश्न आहे व त्याचे उत्तर "नाही" हेच आहे.**

५) विद्यमान निवडप्रक्रिया ही शासननिर्णयात नमूद आहे, त्याप्रमाणे विद्यापीठांनी परिनियम केलेले आहेत विद्यापीठाच्या या परिनियमांना मा. राज्यपालांनी कुलपती या नात्याने संमती दिलेली आहे. या जागा भरतांना जी जाहिरात द्यावी लागते ती विद्यापीठांनी मान्य केलेली असते. या जाहिरातीमध्ये तशा प्रकारची अट नाही. नियमात तशी अट नाही. नेमणूक पत्रात तशी अट नाही. संपूर्णपणे कायदेशिररित्या निवड होवून ४-५ वर्षे झाल्यावर एकाएकी अशी अट टाकल्यामुळे असंतोष तर निर्माण होतोच पण मोठ्या प्रमाणावर कोर्टकचेऱ्या होण्याचा संभव स्पष्ट दिसत आहे.

६) केंद्र शासनाच्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या मूळ शासन निर्णयामध्ये (२७.२.८९) **"प्रोबेशनचा कालखंड कोणत्याही परिस्थितीत २४ महिन्यापेक्षा जास्त असू नये"** अशी स्पष्ट तरतूद आहे. तसे परिनियम झालेले आहेत, तसे परिनियम त्यापूर्वीही महाराष्ट्राच्या सर्व विद्यापीठामध्ये अस्तित्वात होते. त्यांच्या नेमणुकांना मान्यताही मिळाली आहे. त्यामुळे हे ३ ते ४ हजार शिक्षक "स्थायी" झालेले आहेत त्याची नेमणूक केव्हाही सशर्त झालेली नव्हती. त्यांनी रिफ्रेशर कोर्सेस करावे अशी अपेक्षा नमूद आहे पण या रिफ्रेशर कोर्सेसची व्यवस्था सुद्धा अजूनही पुरेशी झालेली नाही.

७) केंद्राच्या सुचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या निर्णयामध्ये याबाबतचा उल्लेख व फरक अतिशय स्पष्टपणे नमूद आहे. रिफ्रेशर कोर्सेस हे शिक्षकांसाठी आहेत. राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. "शिक्षक" या पदाची अभिलाषा धरून स्पर्धेत उतरणारी व्यक्ती ही **"उमेदवार"** असते. व नियमांनी विहित केलेली पात्रता धारण करणाऱ्या अनेक उमेदवारातून कायद्याने नमूद केलेल्या निवड प्रक्रियेनुसार काहींची निवड होते. हे सर्व नियमाप्रमाणे झाले किंवा नाही हे पाहून मा. कुलगुरू त्या नेमणुकीला मान्यता देतात व **त्यानंतर नेमणूक झाल्यावर ती व्यक्ती शिक्षक होते.**

८) विधान मंडळ सदस्य व अशा सदस्यत्वासाठीचे उमेदवार यांच्यामध्ये असलेल्या फरकासारखा हा फरक आहे. तो फरक केंद्राच्या सुचनामध्ये व महाराष्ट्र शासनाच्या मूळ शासननिर्णयामध्ये स्पष्टपणे नमूद आहे. **उमेदवारासाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादल्या जात आहेत.**

९) विद्यापीठातून भरल्या जाणाऱ्या शिक्षकांच्या भरतीसाठी २७.२.८९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये शेवटी नमूद असलेल्या चार ओळी आपल्याला आज फिरवता येतील काय? त्या जर फिरवता येत नाही तर त्याच परिच्छेदातील संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांसाठी असलेल्या तरतुदी कशा फिरवता येतील?

**प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स.**

detailed scheme for conducting the test including its design, the agencies to be employed in the conduct of tests, contents, administration, etc, will be worked out by the UGC, Keeping in view the requirements of the **media of intruction** followed by the different states/universities/ Colleges and other relevant consideration" केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या मूळ परिपत्रकाच्या परिच्छेद ३ (५) मध्ये पुढील उल्लेख स्पष्ट पणे दिसून येतो :-

"The qualifying test for recruitment of lecturers is intended to be organised through a number of agencies keeping in view the requirements of the media of instruction by different states/Universities." उपरोक्त राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही त्या त्या राज्यांमध्ये व विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणामध्ये कोणत्या माध्यमाचा वापर केला जातो हे लक्षात घेवून वेगवेगळ्या संस्थांनी (Number of Agencies) आयोजित करावयाची आहे.

१५. ह्या पात्रता परीक्षा विविध माध्यमातून आयोजित करावयाच्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या मुळ निर्णयाच्या (२७.२.८९) परिच्छेद ९ मध्ये माध्यमाचा उल्लेख अतिशय स्पष्टपणे नमूद आहे. तो पुढील शब्दात : -

9. Only those candidates, who, besides fulfilling the minimum qualifications prescribed for the post of a lecturer, Librarian and Physical Education Staff, have qualified in a comprehensive test to be conducted for the purpose will be eligible for appointment. The detailed scheme for conducting the test including its design, the agencies to be employed in the conduct of the test, content, administration etc. will be worked out by the University Grants Commission keeping in view the requiremnet of the **media of instruction** followed by the different Universities and Colleges and other relevant considerations. २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासननिर्णयामध्ये पुढे असाही स्पष्ट उल्लेख आहे की : "For Purposes of recruitment to the post of Lecturer /Librarian/Director/Instructor of Physical Education in Colleges and Principals of Colleges, the composition of the Selection Committee has already been laid down in Appendix, accompanying Government Resolution, Education and Youth Services Department No. USG 1177/129387/XXXII (Cell), dated 25th October, 1977, **The same procedure should continue to be in operation till it is suitably replaced by the comprehensive test to be prescribed by the University Grants Commission."**

विद्यापीठ अनुदान आयोगाने माध्यमासह सर्व तपशील ठरविल्यानंतर जी "निवडीची प्रक्रिया पात्रता परीक्षेसह" (यापुढे नवी व्यवस्था असे म्हणू) येईल ती १९७७ च्या शासन निर्णयांनी विहित केलेल्या "विद्यमान निवड प्रक्रियेला" (यापुढे विद्यमान व्यवस्था असे म्हणू) "सुटेबली रिप्लेसड" करील असे शासन निर्णयात नमूद आहे. विद्यमान व्यवस्था (निवड प्रक्रिया) सुटेबली रिप्लेसड झाली काय? हा आजचा खरा प्रश्न आहे व त्याचे उत्तर "नाही" हेच आहे.

१६. विद्यमान व्यवस्था निकालात निघून निवड करण्याची नवीन व्यवस्था स्थापीत करण्यासाठी काय कृती करावी लागेल याबाबतच्या तपशीलवार सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला दिलेल्या होत्या. दिनांक १४ मार्च १९९१ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव श्री. वाय.एन. चतुर्वेदी यांनी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याच्या सचिवांना एक पत्र (D.O.No. F.4-12/86 NET) पाठवले त्या पत्रात त्यांनी पुढील सूचना स्पष्टपणे दिलेल्या आढळून येतात :-

"We have not so far received acceptance from your state for setting up such state/regional test. For ensuring acceptable standard of those who get selected as Lecturers in colleges/Universities, setting up such a facility is essential and it would be appropriate that there is no delay in this regard. Specifically the following actions are required :

1. Acceptance by the State Government in consultation with universities of either the UGC-CSIR test (NET) or a State Educational test as a necessary qualification for recruitment as Lecturer in all the Universities/colleges in the State.

2. Amendment of relevant university statutes for prescribing this as a minimum qualification.

3. Prescribing similarly for each private college and including this as a condition in the grant in aid rules for the private Colleges.

4. Amendment of recruitment rules for Government colleges that qualifying in the UGC-CSIR or State/Regional test is a minimum qualification for recruitment as lecturer in Govt. Colleges.

5. Designating an appropriate agency in the State for conducting this test. In many States there are arrangements for conducting pre- medical/preengineering selection tests. This or some other similar organization could conduct the state regional test without adding to administrative expenses".

१७. विद्यमान व्यवस्था (निवडीची) जावून त्याठीकाणी नवीन व्यवस्था कशी येते? कशी यावी? कशी येईल? याबाबत ज्योतिष्याला विचारण्याची आवश्यकता नव्हती. किंवा "३१ मार्च ९४ ला, ३१ मार्च ९५ ला, ३१ मार्च ९६ ला काढून टाकू" चे अंगारे धुपारे दाखवण्याचीही गरज नव्हती. महाराष्ट्रातील प्राध्यापक आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये याबाबत कोणताही वादसुद्धा होण्याची गरज नव्हती. पुर्वोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांची महाराष्ट्र शासनाने प्रथम पूर्तता करणे आवश्यक होते, म्हणजे मग निवडीच्या विद्यमान व्यवस्थेची जागा नव्या व्यवस्थेने घेतली असती या पाच मुद्यांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने १९९४ पावेतो किंवा आजपावेतो काय कारवाई केली याचा थोडासा आढावा घेवू.

१. पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध व्हावे यादृष्टीने "विद्यापीठांशी विचार विनिमय करून नेटशी तुलनीय अशी सेट ही पात्रता परीक्षा महाराष्ट्रामध्ये स्विकारणे व संचालित करणे तसेच त्याबाबतची यंत्रणा ठरविणे" ही विद्यापीठ अनुदान आयोगाची पहिली व पाचवी सूचना आहे. १९९४ पावेतो महाराष्ट्र शासनाने याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. सर्व विद्यापीठामध्ये करावयाची व्यवस्था गरीब बिचाऱ्या महाराष्ट्र शासनाने फक्त पूणे विद्यापीठात केली. परिणामी १९९५ मध्ये जी काही तुटपुंजी व्यवस्था केली आहे त्यानुसार पुरेसे उमेदवार तर उपलब्ध होत नाहीतच पण पाहिजे त्या संख्येच्या २ टक्के सुद्धा उमेदवार शासनाने केलेल्या "सेटबाबतच्या या पुरेशा व्यवस्थेतून" उपलब्ध होवू शकलेले नाही.

२) "किमान पात्रता निर्धारित करणाऱ्या परिनियमामध्ये बदल करा" अशी दुसरी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली होती. आता मूळ सेट बाबतची "गरिबीची व्यवस्था" एका (पुणे) विद्यापीठात करण्यासाठीसुद्धा लागणारी "कारकुनांची तीन पदे" वित्त विभागाकडून अनेक महिने मंजूर न झाल्यामुळे (१५ जानेवारी १९९३ च्या उच्च शिक्षण संचालकांच्या प्रस्तावाला वित्त विभागाने ८ एप्रिल १९९४ ला मान्यता दिली. ती सुद्धा फक्त ३ पदांना व एका विद्यापीठापुरती व तीसुद्धा विधानपरिषदेतील १७ मार्च १९९४ च्या खडाजंगी चर्चेनंतर) गलीतगात्र झालेल्या उच्च शिक्षण विभागाला परिनियम दुरुस्तीचे प्रस्ताव विद्यापीठांकडे पाठविण्याचे धैर्य झाले नाही, यामागची उच्च शिक्षण विभागाची अगतिकता आपण समजून घेतली पाहिजे. "शिक्षकांच्या सेवाशर्ती (पात्रतेच्या अटीसह) परिनियमांनी ठरतील" अशी त्यावेळच्या सर्व विद्यापीठ कायद्यामध्ये तरतूद होती. आजच्या विद्यापीठ कायद्यामध्येही ती आहे. त्या त्या विद्यापीठामध्ये परिनियम हे सिनेटनी मान्य करावयाचे असून मा. चँन्सेलरांची (राज्यपाल) संमती मिळाल्यावर ते अमलात येतात. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठामध्ये सेटची व्यवस्था न करता परिनियम दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेतला तर उच्च शिक्षण विभागाच्या गलथान कारभाराचा फार मोठा बभ्रा होईल या भितीने उच्च शिक्षण विभागाने परिनियम दुरुस्तीच्या प्रक्रियेला आजही हात लावलेला नाही. महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी चँन्सेलर या नात्याने मंजूर केलेल्या विद्यमान परिनियमांचा (पात्रतेच्या अटी ठरवणाऱ्या) सरळ सरळ भंग करून पत्राव्दारे पात्रतेच्या अटी बदलवण्याचा धोपट पण

बेकायदेशीर मार्ग उच्च शिक्षण विभागाने स्वीकारला.

"नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असा पहिला हूकुम २ फेब्रुवारी १९९४ च्या शासन पत्रान्वये काढण्यात आला. "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा दुसरा आदेश ७ मार्च १९९४ च्या पत्रान्वये देण्यात आला. व मग त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश २० मार्च १९९४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आला. परिनियमांनी केलेली व्यवस्था पत्राने मोडून काढण्याच्या या प्रकाराने शेकडो शिक्षकांना गेली दोन वर्षे अत्यंत मानसिक तणावात काढावी लागली. २ फेब्रुवारी १९९४ ते २० मार्च १९९४ या दोन महिन्याच्या (धड दोन सुद्धा नव्हे) काळातील उच्च शिक्षण विभागाची ही तीन पत्रे पाहिली म्हणजे या साऱ्या प्रकाराची एकंदर हास्यास्पदता लक्षात येते. विशेष असे की पत्रापत्रीचा हा सारा प्रकार केंद्र शासनाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, परिनियमांच्या व समझोत्याच्या विरोधात होता.

३. संलग्न महाविद्यालयाच्या अनुदान संहितेच्या नियमामध्ये बदल करा" अशी विद्यापीठ अनुदान आयोगाची तिसरी सूचना होती. पहिल्या दोन सूचनांच्या बाबतीत उच्च शिक्षण विभागाने यथोचित कारवाई न केल्यामुळे याबाबतीत सुद्धा या विभागाला काहीही करता आले नाही. परिनियम न बदलवता पत्राने पात्रतेच्या अटी जशा बदलवण्यात आल्या त्याच धर्तीवर "हे नाही केले तर ते कापा आणि ते नाही केले तर हे कापा" अशा पत्रोपत्री सूचना (अनुदान संहितेत बदल न करता) ए ओ ना किंवा जे डी ना पाठवण्याचा धडाका सतत उच्च शिक्षण विभागाने सुरू ठेवला.

४) "शासकीय महाविद्यालयातून शिक्षक भरतीच्या नियमामध्ये बदल करा" ही विद्यापीठ अनुदान आयोगाची चौथी सूचना होती त्याप्रमाणे शासनाने दोन वर्षापूर्वी आपले सेवाभरती नियम बदलवून "पात्रता परीक्षा सक्तीची" केली होती व लोकसेवा आयोगाच्या तशा जाहिराती यायला लागल्या होत्या. पुरेशी तयारी न करता नियम बदलवल्यामुळे त्या नियमांची अंमलबजावणी अव्यवहार्य ठरली व आता "पात्रता परीक्षा शिथिलक्षम" असा बदल शासनाने केला असून लोकसेवा आयोगाच्या जाहिरातीतून तो जाहीरपणे प्रकट झाला आहे.

५) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पाचव्या अटीबाबत सुद्धा शासनाने केलेली कारवाई अत्यंत अपुरी व असमाधानकारक आहे याचा उल्लेख पहिल्या अटीच्या चर्चेमध्ये आलेला आहे.

१८. सारांश काय तर विद्यमान व्यवस्थेच्या जागी नवी व्यवस्था आणण्यासाठी कोणतीही यथोचित उपाययोजना न करता शासनाने दिनांक २ फेब्रुवारी १९९४ रोजी एकाएकी पत्र (शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक युएसजी १०९३/(२६४९)/विशि-४ दिनांक २ फेब्रुवारी १९९४.) रवाना करून "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असा हुकूम काढला त्यानंतरचा सारा इतिहास ताजा आहे. त्याची तपशीलवार पुनरावृत्ती करण्याची गरज नाही.

*C.A.No. 16/U/ of 1996*

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, NAGPUR.

### *WRIT PETITION NO. 3828 OF 1995.*

**PETITIONER : -** Nagpur University Teachers' Association through its Secretary Prof.E.H.Kathale, having its registered office at "Shikshak Bhavan", Amravati University Campus, Amravati.

***//VERSUS//***

**RESPONDENTS :-** 1) State of Maharashtra, through Secretary, Higher Technical and Employment Department, Mantralaya, Bombay.2) Amravati University,Amravati through its Registrar, Shri.K.G.Khambre, Amravati.

Writ Petition under Article 226 of the constitution of India, prays that this Hon'ble Court be pleased to;

**a)** quash and set aside the impugned action of the respondent No.1 Government of Maharashtra, particularly the Department of Higher,Technical education and Employment vide its letter dated 30-9-1995 on the ground that this is contrary to the law and powers are being exercised by respondent No.1 under the colourable exercise of the powers vested in the respondent No.1 and also the action is contrary to the fundamental rights of the petitioner Association and its members at large and also contrary to the welfare of the teachers community of the University at large.

**b)** Further be pleased to hold that the stand taken by the respondent No.2 Amravati University,Amravati. vide its letter dated 5-9-1995 and 20-11-1995 is valid, proper and according to law.

**c)** Further it be held that handing over of the premises in favour of the petitioner Association cannot be said to be contrary to any of the provisions as mentioned by the respondent No.1,State of Maharashtra in their letter dated 30-9-1995.

**d)** The petitioner Association further prayed that this Hon'ble Court be pleased to grant a stay to the effect and operation of the letter dated 30-9-1995 and further prevent the respondent No.1 from taking any further action by which the petitioner Association should not be deprived of their continued use and occupation of the "Shikshak Bhavan" situated in the campus of respondent No.2 Amravati University till the final decision in the matter.

**e)** Further be pleased to pass any suitable order deem, fit, and expedient in the circumstances of the case.

***: Present :***
**The Hon'ble Shri Justice A.A.Desai**
the 28th December, 1995
***: ORDER :***
**"Notice before admission. returnable early. stay as prayed"**

True Copy
Sd/- Illegible
Assistant Registrar
High Court of Bombay at Nagpur

## SECRETARY'S REPORT ON THE WORKING OF THE ASSOCIATION FOR THE YEAR ENDING ON 31ST DECEMBER, 1995.

*Prepared by the Executive Committee of NUTA under article (VI) **(b) (ii)** of the Constitution of NUTA and presented by the Secretary on behalf of the NUTA Executive.*

Dear Friends,

(1) It gives me great pleasure to accord you all a cordial welcome on behalf of the Executive Committee of NUTA and on my own behalf. It is indeed a proud privilege for me to place before this august body a brief account of our activities and achievements during the year 1995.

(2) Right from its inception, NUTA has been committed to the cause of the welfare of the Teachers' community. In keeping with this commitment, the organisation took up several issues concerning teachers during the period of this report.

(3) During this year, the organisation succeeded in getting several demands fulfilled by the government. Prof. B.T.Deshmukh, making use of parliamentary devices got the government orders pertaining to the counting of previous service for the purpose of placement in Senior Scale/Selection Grade. Now the Government resolution regarding counting of previous service for the purpose of placement in Senior Scale/ Selection Grade is issued. Further it is due to the employment of appropriate devices in the legislative council that the Government resolutions regarding, qualifications in respect of P.E. Ts in Junior colleges, and revised pay-scales to vocational teachers at +2 level are also issued. Prof. B.T. Deshmukh also succeeded in getting orders issued in respect of nonpayment of salaries to the lecturers of Karmavir Mahavidyalaya, Mul and the pending arrears of U.G.C. pay-scales to the lecturers of National Institute of Social Work, Nagpur.

(4) It needs to be mentioned here, that physical education teachers in junior colleges were required to have 2nd division at graduation level, while teachers of other subjects in junior colleges need not possess 2nd division at graduation level. This unjustified discrimination was brought to the notice of the government by prof. B.T. Deshmukh in the Legislative Council and consequently the government removed this discrimination by issueing the G.R. dated 13th March. 1995. On the same lines another achievement was in favour of the college teachers working in the Tribal areas. The government declared incentive allowance to the officers and the school teachers working in the Tribal areas and excluded the college teachers from the same incentive allowance. However the govt. had agreed to provide the incentive allowance to the college teachers also, after the successful attempt of Prof. B.T.Deshmukh. Similarly when 108 teachers from Anjangaon Surji were taken by the police into custody after their agitation, Prof. B.T.Deshmukh gave notice under rule 93 in the Legislative Council and extracted the assurance from the Home Minister to drop all cases against those teachers.

(5) **University Elections :** You are aware that the new Maharashtra Universities Act, 1994 has come into effect from 22nd July, 1994 and the process of electing new bodies took place in all the Non-agricultural universities in the state during this year. It is worth mentioning here that the Senate elections in Amravati University area were fought officially by NUTA for the first time in the history of our organisation. And I am happy to report that 14 out of 19 elected teachers and 8 out of 10 elected graduates were from the official panel of NUTA. In Nagpur University Senate elections, although there was no official panel, 13 out of 18 elected teachers and 4 out of 10 elected graduates were from the panel fielded by teachers and other like-minded comrades supporting NUTA. I express my heartfelt thanks on behalf of NUTA to all of you for showing faith in NUTA's leadership. I congratulate all the elected Senate members on their victory and assure you that they will work hard in various university bodies for the cause of betterment of the University Administration in general and teaching community in particular and fulfill their commitment as promised in the election manifestoes.

(6) **State Government's "Black Order" to Amravati University in respect of "Shikshak Bhavan".** : You are all aware that the Amravati University has handed over "Shikshak Bhavan" located in the campus of Amravati University to NUTA on the 11th June 1995. Though this was done in consonance with the well established principle of providing suitable premises to the registered Association for its organisational activities, the Govt. of Maharashtra vide its order dated 30th September, 1995 has directed the Amravati University to withdraw the handing over of the Shikshak Bhavan. By doing so the government has made prejudicial invasion on the university autonomy on the basis of false, illegal and extra-constitutional factors. It is worth mentioning here that the earmarked donation of Rs. One lakh received for this purpose was utilised by Amravati University as provided for in section 8 (1) (d) of Maharashtra Universities Act. 1994. We strongly condemn this action on the part of the government of Maharashtra and appeal to you to be ready for struggle that may be required to be launched against this dictatorial attitude of the Govt. and to uphold the spirit of just and legal claim of the teachers' organisations.

(7) Task Ahead : You are already in the know of the fact that the Rastogi Committee has been set up by the U.G.C. to consider revision of pay scales of University and college teachers after the teachers organisations pressed for the same. Now it is our concern that the committee submits its report at the earliest. MFUCTO had organised a massive morcha at Bombay on 25.9.95 and the Charter of demands included the acceptance by Rastogi committee and the Fifth pay Commission of the demands presented to them by the AIFUCTO. I feel happy to state that the Morcha was largely attended by the members of NUTA from Nagpur & Amravati University area. This action at state level was preceded by the All-India level action programme of "Dharna" at Delhi on 21.8.95 to expedite the working of the Rastogi committee. The organisation has already made its stand clear in respect of the clearance of NET/SET as the eligibility condition for the recruitment of teachers in Universities and colleges and the same has been circulated on page No. 57 of 1994 NUTA Bulletin. This stand of ours was also endorsed and supported by the MFUCTO and the same was incorporated in its report for the year 1994 as circulated on page no. 43 of 1995 NUTA Bulletin. The Charter of Demands in pursuance of which the Morcha was taken out by MFUCTO at Bombay on 25.9.95 also included "immediate withdrawal of government circular stipulating that teachers who do not clear the NET/SET examination before 31st March 1996 should be discontinued and application of the NET/SET conditions only to candidates and not to teachers already in service".Consequent to our efforts, the Govt. issued the Resolution dated 22.12.95 which definitely indicates that the Government has realised the fault in its previous stand and has provided a partial and temporary relief to the possible victims of NET/SET. However we cannot ignore the illegality of the conditions incorporated in this G.R. and also the magnitude of the harm to be caused by these conditions. It will be, nonetheless, pertinent here to state that the teachers will have to be ready for the struggle to force the government to accept the correct position on the issue and also for the possible struggle for pay revision.

**(8) Membership of NUTA :** The NUTA membership has reached upto 3405 at the end of this year. This year the increase in membership is 24

(9) I am glad to inform you that NUTA Bulletin has completed its 20th year of its purposeful existence. This year we have circulated 64 pages of NUTA Bulletin. If you go through the NUTA Bulletin from 1st to last page, you will find that NUTA Executive has tried to give up-to-date information to all its members about their problems and how the NUTA Executive particularly its President Prof. B.T.Deshmukh has focussed them at Maharashtra Govt. level through the Legislative Council.

(10) I am thankful to the press and their representatives both from Nagpur & Amravati areas, for wide coverage to the activities of the Association. This report shall not be complete unless I acknowledge the active cooperation and support of all the members of NUTA and also from nonmembers i. e. University, College and Junior College Teachers in the activities of the Association and response given by them to the various calls given by NUTA from time to time.

Yours

**(E.H.Kathale)**,

Secretary, NUTA.

*****

# 'डॅडीं'चे एकसष्टीत पदार्पण

***प्रा.बी.टी.देशमुख अध्यक्ष ''नुटा''***

"प्राचार्य डॅडी देशमुख यांनी एकसष्टीत पदार्पण केल्याबद्दल त्यांचा षष्ठ्ब्दीपुर्ती सोहळा योजिला आहे. समारोहास सोबत दर्शविलेल्या मान्यवरांची उपस्थिती लाभत आहे. या आनंद सोहळ्यात आपण अगत्यपूर्वक सहभागी व्हावे अशी विनंती" करणाऱ्या अकोला नगराध्यक्षांच्या व समारोह समितीच्या सदस्यांनी दिलेल्या या निमंत्रणपत्रिकेमध्ये २३ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता होणाऱ्या या समारोहास उपस्थित रहाणाऱ्या मान्यवराच्या यादीत माझेही नाव होते व ते माझ्या पूर्वसंमतीनेच टाकण्यात आले होते पण मला त्या दिवशी उपस्थित रहाता आले नाही.

"अमरावती विद्यापीठाचे शिक्षक भवनाच्या वास्तूबाबत विद्यापीठ अधिनियमाचा भंग झाल्याचा शासनाचा आरोप" या विषयावरील लक्षवेधी सूचनेवर गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर १९९५ रोजी विधानपरिषदेत झालेल्या अनुपुरक चर्चेमध्ये "ही कायदेशीर बाब आहे म्हणून विधी व न्याय विभागाला दाखवून याबाबत लौकर निर्णय घेवू..... या संबधी २२ तारखेनंतर १५ दिवसाच्या आत कायदेशीर बाबी पाहून निर्णय घेण्यात येईल" अशा प्रकारचे आश्वासन मा. राज्यमंत्रिमहोदयांनी दिले होते. १५ दिवस होवून गेले तरी याबाबत शासनाचा कोणताही निर्णय झाला नव्हता. उपरोक्त आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाने केलेल्या कारवाईची विवरणपत्रे दाखल झाली नव्हती. दिनांक ९ जानेवारीच्या बैठकीमध्ये विधान परिषदेच्या आश्वासन समितीने याबाबत उच्च व तंत्रशिक्षण तसेच विधी व न्याय विभागाच्या सचिवांची संयुक्त साक्ष घेण्याचे ठरविले होते व या उभय सचिवांची साक्ष आश्वासन समिती समोर २३ जानेवारीला दुपारी ३.३० वाजता ठेवण्यात आली होती. मी स्वतः या आश्वासन समितीचा सदस्य असल्याने ही बैठक टाळणे मला योग्य वाटत नव्हते.

एकाच दिवशी दोन कार्यक्रमांचा क्रम ज्यावेळी आमनेसामने उभा रहातो त्यावेळी परस्पर प्राथम्य क्रम ठरवून त्यातील "एक करावा एक सोडावा" चा निर्णय सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला घ्यावा लागतच असतो. सोडाव्या लागलेल्या कार्यक्रमाबाबतची थोडीफार हुरहूर व खंत सुद्धा मनाला कमीजास्त प्रमाणात वाटतच असते. या समारोहाला उपस्थित रहाण्याचे मला सोडावे लागल्यामुळे मला वाटणारी खंत महत्तम होती हे नमूद करणे मला आवश्यक वाटते.

दोन तीन दिवसापूर्वी मी स्वतः डॅडीना ज्यावेळेला आश्वासन समितीसमोरील कामाची कल्पना देवून अकोल्याला अनुपस्थित रहाण्याची परवानगी मागितली तेव्हा अत्यंत उदारपणे त्यांनी मला ती दिली, इतकेच नव्हे तर "तेथे तुमची उपस्थिती आवश्यक आहे. ते काम महत्त्वाचे आहे" असे उलट मलाच सांगितले. केवळ त्यांनी हे मला सांगितले असे नव्हे तर त्यांनी आपल्या सहकाऱ्यांनासुद्धा त्या कामाची कल्पना दिली असे माझ्यानंतर लक्षात आले. दिनांक २२ जानेवारीला दुपारी विदर्भ एक्स्प्रेसने मुंबईला रवाना होण्याच्या दोन तासापूर्वी प्रा.विठ्ठल वाघ यांचा फोन आला "काहो मंग काय ठरल मुंबईच? इवून राह्यले का जावून राह्यले?" मी "जावून राह्यलो" अस सांगितल तर विठ्ठल वाघांनी मलाच उलट मुंबईच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या.

२३ तारखेला मुंबईचे काम आटोपून मी २४ तारखेला अमरावतीला परत आलो तर अकोल्याच्या या समारंभाचा जो अहवाल उपस्थित असलेल्या सहकारी मित्रांनी सांगितला व वृत्तपत्रातून वाचला त्यामुळे आपण अनुपस्थित असण्याची खंत आणखीच वाढली. संघटनेच्या कामामधील डॅडींचा सहभाग लक्षात घेता संघटनेचा अध्यक्ष या नात्याने या समारोहाला आपल्याला उपस्थित रहाता आले नाही यामुळे मनाला खूपच अपराधी पणासारखे वाटले. नुटाच्या स्थापनेनंतर डॅडी हे अगदी पहिल्या वर्षापासून या कामात सहभागी होते असे त्यावेळचा रेकॉर्ड सांगतो. १७ मार्च १९६३ ला संघटनेची स्थापना झाल्यानंतर १९६३-६४ च्या कामकाजाचा पहिला वार्षिक अहवाल विचारात घेण्यासाठी रविवार, दिनांक २९ मार्च १९६४ रोजी "युनिव्हर्सिटी युनियन बिल्डिंग नागपूर" येथे झालेल्या नुटाच्या आमसभेला जे ३१ सदस्य हजर होते त्यात डॅडींची (बी.एस.देशमुख) उपस्थिती आहे. त्यावेळी ते धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून काम करीत होते.

डॅडींच्या विविधांगी जीवनामध्ये संघटनेचे काम हे एक अंग होते हे खरे आहे पण संघटनेतील प्रत्येक मोक्याच्या व आणीबाणीच्या प्रसंगात डॅडी आघाडीवर होते. अनेक महिने पगार न होणाऱ्या चमत्कारिक समस्येने विदर्भातील उच्च शिक्षण क्षेत्र व्यापुन टाकले होते. नुटाने ५ सप्टेंबर १९७७ पासून बेमुदत संपाचा कार्यक्रम सुरू केला. अमरावती येथे नमुन्यातील कोल्हटकर मंगल कार्यालयामध्ये सत्तारूढ पक्षाचे एक शिबिर पुढील निवडणुकीच्या तयारीसाठी आयोजित करण्यात आले होते. नानासाहेब वैराळे हे प्रमुख अतिथी म्हणून या शिबिराला उपस्थित होते. ४००-५०० प्राध्यापकांची खूपच उग्र निदर्शने शिबिर बंद पडेपर्यंत सुरू होती. समोरच्या फळीमध्ये असलेल्या निदर्शकांमध्ये आमची काहींची ऊंची बरी होती तर रुंदी कमी होती काहींची रुंदी बरी होती तर ऊंची कमी होती. उंची व रुंदी या दोन्हीचा लाभ असलेले डॅडी त्या निदर्शकांमध्ये उठून दिसत होते. डॅडींचे पक्षीय विचार व नानासाहेब वैराळे यांच्याशी असलेला त्यांचा वैयक्तिक स्नेह यांच्या पार्श्वभूमीवर या निदर्शनातील त्यांच्या आक्रमक सहभागाने खूपच प्रभाव पाडला. "त्यांचे नक्की काय म्हणणे आहे ते मला माहीत नाही पण आपले काही तरी चुकत आहे" असा निरोप नानासाहेब वैराळे यांनी मुख्यमंत्र्यांना दिला. शासनाने चर्चेसाठी बोलाविले. १० सप्टेंबरला चर्चेसाठी नुटाच्या सहा सदस्यांचे जे शिष्टमंडळ मुंबईला गेले त्यात डॅडी होते. ब्लॉक ग्रँट, डेफिसिट ग्रँट इत्यादी बाबी फारशा कळत नसलेल्या आम्हा मंडळींना डॅडी देशमुख व प्राचार्य अण्णासाहेब वैद्य यांची त्यावेळी खूपच मदत झाली. सॅलरी स्कीम लागू झाली.

१९८७ मध्ये झालेल्या प्रदीर्घ संपानंतर जे मान्य केले ते अमलात आणण्यास शासनाने नकार दिला तेंव्हा १२ डिसेंबर १९८८ पासून पुन्हा एका प्रदीर्घ संपाला सुरुवात झाली. सुरू झालेले संप आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय १८ डिसेंबर १९८८ रोजी नागपूर येथे झालेल्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाने घेतला. राज्यात कोठेही "शिक्षणमंत्री उपस्थित रहाणार असतील त्या सर्व ठिकाणी निदर्शने" करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला. आंदोलन तीव्र करण्याच्या या निर्णयानंतर विदर्भात पहिला योग अकोल्यामध्ये आला. तत्कालीन शिक्षणमंत्री काही कार्यक्रमानिमित्त अकोल्यामध्ये आले. ३०० प्राध्यापकांना सोबत घेऊन निदर्शने करणाऱ्या डॅडींनी प्राध्यापकांसह सर्किट हाऊसचे फाटक अडविले. डॅडी त्यावेळी प्राचार्य होते. नगराध्यक्ष होते जानेवारी १९८९ च्या सुरुवातीला शासनाशी मुंबईमध्ये चर्चा चालू असतांना अकोल्यातील व दरम्यान त्याचवेळी पुण्यात घडलेल्या या प्रकारानंतर एकदम वातावरण बदलले. कुठतरी मिटल पाहिजे ही भावना निर्माण झाली. सुरुवातीला शासन बोलायलाच तयार नव्हते. बोलायला तयार झाले तर ऐकायलाच तयार नव्हते. ऐकायला तयार झाले तर समजून घ्यायलाच तयार नव्हते. आमचे युक्तिवाद वाया जात आहे हे आमच्या लक्षात येत

**प्रिय डॅडी,**
**सिंहासारखं मागं वळून पहावं**
**असं लोभस- संपन्न आयुष्य**
**साऱ्यांनाच लाभतं असं नाही ...**

**काही हातच कर्तृत्व गोंदवून प्रकट होतात ...**
**अशा समर्थ हातांना नेक इराद्यांची अन्**
**सत्शील पावलांची सोबत लाभतेच असंही**
**नाही.**

**पावलं प्रामाणिक राहिली ... भक्कम पडली**
**... निर्धारपूर्वक**
**... वाटा स्वागतशील ... सरळ झाल्या**
**यश अमाप आले चालत ... शोध घेत...**

**अशावेळी**
**भिंतींचे ढासळणे अनिवार्य असते ...**
**प्रवासालाही मोकळ्या होतात सर्व दिशा ...**
**मित्र असतात- समव्यवसायी शिक्षक**
**असतात**

**हवालदिल झालेली साधारण माणसे**
**भोवताल विखुरलेली दिसतात आणि**
**आपल्याजवळ असतं सामाजिक जाणिवांनी**
**कसदार झालेलं पण उदार मन ...**

**कलावंताचं हळवं मन ...**
**जरूर तेंव्हा कणखर प्रशासन ...**
**राजनीतीच्या निसरड्या शेवाळ क्षेत्रात**
**प्रांजळ, स्वच्छ मनाला**
**लोकहित प्रधान मानण्यात करावी लागणारी**
**कसरत ...**
**कधी यश तर कधी क्षणिक विषाद ...**
**हे सारं कशासाठी?**

**एकटं सडसडीत जीवन झुगारून, स्वतः**
**एक समूह सतत जागवत राहण्याचे औदार्य ...**
**त्यातून कर्तृत्वाला आलेला बहर**

**डॅडी,**
**तुमचा फोटो काढू म्हटलं तरी सारखा**

**ग्रुप फोटोच का निघतो?**

**हा सारा सामूहिक कर्तृत्वाचा आलेख**
**सगळ्याच आयुष्यांना लाभतो असं नाही**

**तुम्हाला**
**सिंहासारखं मागं वळून पाहावं**
**असं लोभस संपन्न आयुष्य लाभलं**
**मनःपूर्वक अभिनंदन ...**
**निकोप ... निरामय**
**उदंड आयुष्य लाभावं ...**
**उत्तरायुष्य**
**आहे याहून संपन्न - समृद्ध व्हावं ...**
**उत्कर्षाची कमान सतत चढती राहावी**
**डॅडी**
**पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा.**

*डॉ.शरद कळणावत*
अकोला
२३ जानेवारी १९९६

होते.

आमचे युक्तिवाद हे आता ऐकले जाऊ लागले, लक्षात येऊ लागले. युक्तिवादाची शक्ती ज्यावेळी प्रभावी ठरत नाही त्यावेळी शक्ती प्रदर्शन हाच प्रभावी युक्तिवाद असतो. (When argument ceases to be a strength, strength is the only argument) या राज्यशास्त्रातील प्रमेयाचा एवढा प्रत्ययकारी प्रत्यक्ष आविष्कार त्यापूर्वी मी कधीही पाहिला नव्हता.

संघटनेतील डॅडींच्या सर्व कामाचा आढावा घेण्यासाठी हे दोन शब्द लिहिलेले नाहीत. संघटनेच्या बाहेरील त्यांच्या कामाचा आवाका तर स्वतंत्र लिखाणाचा विषय आहे. स्वतःचे घर बांधतांना सुध्दा डॅडींनी आपला सारा ग्रुप बरोबर घेतला. आंतरराष्ट्रीय पारितोषकास पात्र ठरलेला "देवकी नंदन गोपाला" घडवितांना आपल्या अनेक सहकाऱ्यांना त्यांनी चंदेरी पडद्यावर आणले. म्हणून कळणावत म्हणतात तेच खरे आहे. "त्याचा एकट्याचा फोटो काढू म्हटल तरी ग्रुप फोटोच कां निघतो?" या प्रश्नाचे उत्तर सर्वांना घेवून चालण्याचा त्यांच्या या कलेत आहे."मनःपूर्वक, निकोप, निरामय उदंड आयुष्य लाभावं, उत्तरायुष्य आहे याहून संपन्न - समृद्ध व्हावं" यासाठी हार्दिक शुभेच्छा.

## बुलेटीनच्या या अंकाच्या पृष्ठ १९ वरील मजकूर रद्द समजावा

१. रविवार दिनांक २८ जानेवारी १९९६ रोजी दुपारी ३.३० वाजता हुतात्मा स्मारक, राजकमल चौक, अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा राज्यस्तरीय मेळावा आमंत्रित करण्यात आला होता. त्याच दिवशी सकाळी १०.३० वाजता नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. नुटाच्या पुढील आमसभेच्या बैठकीचे ठिकाण घटनेप्रमाणे कार्यकारी मंडळानी ठरवावयाचे असते. ठिकाण ठरल्याशिवाय "अजेंडा व दुसरी मिटींग नोटीस" मुद्रित करता येत नाही.

२. अशा परिस्थितीमध्ये आज प्रसिद्ध झालेल्या नुटा बुलेटीनची पृष्ठ १५ ते २६ अशी बारा पृष्ठे मेळाव्यामध्ये वितरीत करण्यासाठी मुद्रित करून घ्यावी असे ठरले व त्यामुळे या १२ पृष्ठांचे मुद्रण करून घेण्यात आले. आमसभेचे स्थळ (२८ तारखेला कार्यकारी मंडळात) ठरल्यानंतर पृष्ठ १३,१४ व २७, २८ या ४ पृष्ठांचे मुद्रण करावे असे ठरले होते.

३. दरम्यान २३ तारखेला शिक्षक भवनबाबत महाराष्ट्र शासनाने २२ तारखेला काढलेल्या सुधारित आदेशाची माहिती मिळाली. व राज्यस्तरीय मेळावा रद्द झाल्याचे वृत्तपत्रिय निवेदन २४ तारखेला सचिवांनी वितरीत केले.

४. उपरोल्लेखीत परिस्थितीत बुलेटीनच्या या अंकाच्या पृष्ठ १९ वर जे आवाहन "Save Shikshak Bhavan : NUTA Legal Aid Fund" या मथळ्याखाली करण्यात आलेले आहे त्यातील सर्व मजकूर (आता लिगल एड फंडाची कोणतीही आवश्यकता राहिलेली नसल्यामुळे) रद्द समजावा - **संपादक.**

## विदर्भातील महाविद्यालयीन ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची सभा : *सभेची सूचना*

विदर्भातील महाविद्यालयातून काम करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची एक सभा नुटाच्या वतीने **शुक्रवार, दिनांक १६ फेब्रुवारी १९९६ रोजी दुपारी ४.०० वाजता भारतीय महाविद्यालय, अमरावती** येथे बोलाविलेली आहे. संबधितांनी उपस्थित रहावे अशी त्यांना विनंती आहे.

वरिष्ठ व निवडश्रेणीतील वेतननिश्चितीचे गैरफायदेशीररित्या पुनर्निश्चयन करण्याच्या शासनस्तरावरील गंभीर प्रकाराचा या सभेत विचार करण्यात येईल.

एकनाथ कठाळे
सचिव "नुटा"

***Agenda continued from page 13***

*tary will present the Annual Report, on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 197 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**TO APPROVE** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 1996.

***Notes :*** *(i) Prof. S.A.Tiwari Treasurer, NUTA, will present the Budget on behalf of the Executive Committee. (ii) The copy of the Budget is circulated on page No.14 of 1996 NUTA Bulletin.*

## ITEM NO.198 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**TO CONSIDER AND TO APPROVE** the following resolution for the appointment of auditors for the Financial year ending on 31st March, 1996 namely :-

" **C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas" Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 1996**"

***Note*** *: (i) As per Article VII of the Constitution the "General Body shall appoint auditors annuallly in the Annual Meeting of the Association.'' (ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution (Vide item No. 2 of 1996) which is now placed before the General Body for its approval. (iii) Prof. S.A.Tiwari Treasurer, on behalf of the Executive Committee, will move the resolution.*

**विषय क्रमांक १९९ :**
**"नेट सेट" बाबत २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाबाबत संघटनेची भूमिका**

कार्यकारी मंडळाच्या वतीने मांडण्यात येत असलेला पुढील प्रस्ताव **विचारात घेणे व मान्य करणे :-**

नेटसेट संबधीच्या २२ डिसेंबर १९९५ च्या शासननिर्णयाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ जानेवारी १९९६ च्या बैठकीत मंजूर केलेल्या ठरावात व्यक्त झालेल्या मताशी हे सभागृह पूर्ण सहमती व्यक्त करीत आहे. *(नोट : सदरहू ठराव याच बुलेटीनच्या पृष्ठ १५ वर प्रसृत करण्यात आला आहे.)*

**विषय क्रमांक २०० :**
**शारिरीक शिक्षण शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत**

**प्रा.सुभाष एस. देशमुख हे पुढील प्रस्ताव मांडतील :-** "महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन शारिरीक शिक्षण शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत बरेच वर्षापासून रेंगाळत असलेला प्रश्न सोडविण्याबाबत नुटा आणि मा. बी.टी.देशमुख यांनी अथक परिश्रम केले. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयीन शारिरीक शिक्षण शिक्षकांना न्याय मिळाला आहे. त्याबद्दल महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन शारिरीक शिक्षण शिक्षकांच्या वतीने आम्ही प्रा.बी.टी.देशमुख व नुटाच्या कार्यकारिणी सदस्यांच मनःपूर्वक अभिनंदन करीत आहोत. तसेच त्यांचे आभारी आहोत.

*****

**Rules For Proposing Amendmentss**
**(Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin)**

1. Any proposal before the meeting may be amended (a) by leaving out a word or words or (b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or (c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall : (a) not constitute a direct negative to the original resolution : (b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

**correction :** on page 20 of 1996 NUTA Bulletin, in para 5 in line 11 the figure "18" be substituted by "20"

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER AND ACTING EDITOR :** R. Chittaranjan, Gulmohar Colony, Camp, Amravati-444 602 Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 263 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10**
Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **03 - 02 - 1996**

**if Undelivered please return to :**
NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan,
Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.